# प्रकरण दुसरे

## गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणातील बदल

# प्रकरण दुसरे

## गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणातील बदल

गडहिंग्लज शहराचा प्रसिध्द चेहरा हा व्यापाराचा आहे. शेतीतून पिकणारा माल व्यापार पेठेत आणून पेढयांवर विक्रीसाठी ठेवणे आणि तेथून महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक इत्यादी राज्यांत पोहचविणे हे येथील प्रमुख काम आहे. शेती आणि पेढयांवरील मजुरी हे भूमीहीन गरीब लोकांचे जीवन आहे. गडहिंग्लज तालुका हा कोल्हापूरच्या दक्षिणेला ६० कि.मी. अंतरावर आहे. तालुक्यात रस्त्याची गैरसोय आहे. तसेच डोंगराळ विभागही मोठया प्रमाणावर आहे. यामुळे या भागात शैक्षणिक सांस्कृतिक प्रगती नसावीच असे वाटते. गारगोटी येथील मौनी विद्यापीठ हे त्याकाळी गडहिंग्लज येथे स्थापन झाले असते तर आजच्यापेक्षा या परिसराचे रंगरुप वेगळे ठरले असते. मौनी विद्यापीठाचे शिल्पकार जे.पी. नाईक हे गडहिंग्लज भागातले होते. गडहिंग्लजपासून जवळ असलेले बहिरेवाडी हे त्यांचे जन्मगाव आहे. त्यामुळे गडहिंग्लजशी त्यांचा जवळचा संबंध होता. मौनी विद्यापीठाची स्थापना त्यांना येथेच करावयाची होती. परंतु शेवटी गारगोटी येथे मौनी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

### गडहिंग्लज तालुक्याचा शैक्षणिक आढावा

गडहिंग्लज येथे मौनी विद्यापीठ स्थापन करण्याचा फार मोठा प्रयत्न अयशस्वी ठरला. परंतु तालुक्याचा विकास साधावयाचा असेल तर शैक्षणिक प्रगती झाली पाहिजे, याची जाणीव असलेली शिक्षणप्रेमी माणसे येथे होती. कोल्हापूर संस्थानच्या सहकार्याने सन १८४९ मध्ये या तालुक्यात

सरकारी प्राथमिक शिक्षणाची सुरवात झाली. सन १९९० मध्ये गडहिंग्लज शहरात ऐकमेव मराठी शाळा होती. त्यानंतरच्या काळात नूलचे श्री. दिनकरराव शिंदे, गडहिंग्लज येथील के. काळू मास्तर, के.सुतार मास्तर इत्यादी मंडळींनी शैक्षणिक जाणीव आणि वातावरण निर्माण करण्याचे मोलाचे काम केले. या प्रमाणेच शासकीय प्रयत्नांमुळे आज गडहिंग्लज तालुक्यात १०५ एवढया प्राथमिक शाळा चालू आहेत.

आज गडहिंग्लजचे शैक्षणिक विश्व विविध प्रकारे विकसित झाले आहे. येथे नगरपरिषदेच्या सहा व खाजगी पाच असा अकरा प्राथमिक शाळा आहेत. जिल्हा परिषदेची एक व खाजगी ४ माध्यमिक शाळा तर जिल्हा परिषदेचे एक आणि खाजगी ४ कनिष्ठ महाविद्यालये आहेत. दोन महाविद्यालये, एक डी.एड्. कॉलेज, एक आय.टी.आय. असा आजचा शैक्षणिक पसारा आहे. तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १०५ व खाजगी १ प्राथमिक शाळा, ३५ माध्यमिक व ३ उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. या आकडेवारीवरुन आजच्या शैक्षणिक विस्ताराची कल्पना येईल.

गडहिंग्लज परिसरातील शैक्षणिक ज्ञात इतिहास हा १४५ वर्षांचा असला तरी ८०-८५ वर्षांपासून म्हणजे विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून या कार्याला एक आकार येऊ लागला. [१]

गडहिंग्लजमध्ये आज बालवाडीपासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व शाखांच्या शिक्षणाची सोय आहे. मराठी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची व्यवस्था आज उपलब्ध आहे. या सुविधांमुळे गडहिंग्लज तालुक्या-प्रमाणेच आसपासच्या तालुक्यातूनही विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठी

इकडे येतात. प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयीन पातळीपर्यंत या शहरात सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

जवळपासच्या सर्व गावांना हे शहर एस्.टी.ने जोडलेले असल्यामुळे अनेक विद्यार्थी आणि विशेषत: विद्यार्थिनी जाऊन-येऊन शिक्षण घेतात. तथापि शिक्षणप्रेमी मंडळींनी मुलांच्या गरजा लक्षात घेऊन पन्नास पाऊणशे वर्षांपूर्वी येथे बोर्डिंगचीही व्यवस्था केली. आज त्यांच्या द्रष्टेपणाची फळे स्पष्टपणे पाहाता येतात. बहुतेक सर्व हायस्कुलांची आणि महाविद्यालयांची वसतिगृहे आज आहेत, शिवाय शिवाजी मराठा बोर्डिंग हे सर्वांत जुने, त्यानंतर स्थापन झालेले बसवेश्वर बोर्डिंग, शासनातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी चालविले जाणारे शासकीय वसतिगृह अशी तीन स्वतंत्र वसतिगृहे या शहरात आहेत. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहाखेरीज एक अन्य वसतिगृहही येथे चालविण्यात येते. देवदासींच्या मुला-मुलींसाठी चालविले जाणारे वसतिगृह हे गडहिंग्लजचे मुख्य वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. वसतिगृहांतून प्रवेश न मिळाल्यामुळे स्वतंत्रपणे खोल्या घेऊन राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही पाचशेच्यावर आहे. मुलींसाठी वेगळे वसतिगृह नाही ही एक अडचण अवश्य आहे. नगरपरिषदेच्या विकास-योजना आराखड्यात यासाठी जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. [२]

## गडहिंग्लज तालुक्याचे सामाजिक आणि आर्थिक स्वरूप

लोकशाही व्यवस्थेत संख्यासामर्थ्य राजकीय प्रभावीपणाचा निकष आहे. विविध जातिसमूहातील सत्तास्पर्धेची परिणती जातीयवादी

राजकारणात होत असते. जातीय राजकारण महाराष्ट्राच्या राजकारणाची वास्तविकता आहे. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते जाती संस्थेने भारतीय राजकारण पूर्णपणे व्यापून टाकले आहे, तर काहींच्या मते आर्थिक व राजकीय शक्तीप्रवाहाच्या प्रभावामुळे जातीसंस्थेत मूलगामी स्वरूपाचे बदल घडून आले आहेत. प्रा. रजनी कोठारी यांच्या मते, जाती संस्थेमुळे राजकारणाला सामाजिक पाया प्राप्त होतो, तर जातिसंस्थेचे राजकीयीकरण ( Politicisation ) होत असते.

## जातिसंस्थेचे राजकारणावरील प्रभुत्व

श्रीनिवास आणि इतर समाजशास्त्रज्ञांच्या मते जातिसंस्था या पारंपरिक संरचनेत प्रातिनिधिक लोकशाहीच्या प्रक्रियेमुळे कोणतेही बदल घडून आले नाहीत. जातीचे जातीय स्वरूप बदलले नाही. (Caste does not cease to be Caste ) प्रातिनिधिक लोकशाहीकरणामुळे जातिसंस्था कमकुवत होण्याऐवजी अधिक प्रबल झाली आहे. भारतीय समाजात जातिव्यवस्थेची चौकट अजूनही भक्कम आहे. व्यक्तीचे जीवन बहुतांशी जातिबंधानेच बांधलेले असते. निवडणुकांच्यावेळी जातीचाच विचार केला जातो. निवडणुका जिंकण्याच्या तंत्रात प्रथम आवश्यक तंत्र म्हणजे जातीचा आधार घेणे हेच असते. जातीच्या भावनिक आवाहनावरच उमेदवार मतांचा प्रवाह वळवून घेण्याचा प्रयत्न करतो. सत्तारूढ आणि विरोधी पक्षांचे दोन्हीही लोक जातीच्या आधारानेच निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करीत असतात. भारतीय समाजात जातिसंस्थेला इतके पक्के स्थान प्राप्त झाले आहे की, अजूनही जातीबाह्य विचार करणे सत्तारूढ पक्ष आणि शासन यांनाही शक्य होत नाही. प्रा. रजनी कोठारी यांच्या मते स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही करणाच्या प्रक्रियेतून

भारतातील विविध सामाजिक समूहांना त्यांच्या राजकीय आकांक्षांची पूर्तता करण्याची संधी प्राप्त झाली आणि जातीचे राजकीयीकरण घडून आले. जातीसमूहांच्या राजकीय प्रक्रियेतील सहभागामुळे राजकारणाचे संस्थीकरण ( Institutionalisation ) घडून आले आहे. कारण विविध सामाजिक गट आपापल्या राजकीय आकांक्षांची पूर्तता करण्याकरिता आणि हितसंबंध जोपासण्याकरिता राजकीय पक्षांशी देवाण-घेवाण करणे व राजकीय पक्ष आणि त्यांचा अभिजनवर्ग आपल्या समर्थकांची संख्या वाढविण्याबाबत उत्सुक असणे नैसर्गिक आहे. या आदान-प्रदानाच्या प्रक्रियेत जातिसंस्थेच्या स्वरूप व कार्यभागात बदल घडून येतात आणि राज्यकर्त्यावर्गाला समाजाच्या विविध गटांच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. म्हणजेच "जातीय राजकारण" अपरिहार्य आहे.[3] गडहिंग्लज तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात जातीचे फारच मोठे वर्चस्व आजही आढळते. राजकीय निवडणुकीत उमेदवाराची निवड, उमेदवाराचा मतदारसंघ, उमेदवाराचा प्रचार हा जातीवर ठरत असतो. जातीनिष्ठा आजही प्रबळ असल्याचे आढळते. ग्रामीण भागातील नेतृत्वाचे स्वरूप जातीशी संबंधित आहे. गडहिंग्लज तालुक्यात मराठा आणि लिंगायत समाज मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे तालुक्याच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मराठा-लिंगायत समाजातील अभिजनांचे प्राबल्य आढळते. या तालुक्यात इतर अनेक जाती काही प्रमाणात आहेत. परंतु त्यांचा राजकारणावर विशेष प्रभाव आढळत नाही.

## गडहिंग्लज तालुक्याची आर्थिक स्थिती - शेतीव्यवस्था

शेती हा गडहिंग्लज तालुक्याचा मुख्य व्यवसाय आहे. तालुक्यातील जास्तीतजास्त शेती ही पावसावर अवलंबून असते. त्यामुळे खरीप हंगामातील

पिकाखाली जास्त जमीन आहे. खरीप हंगामात, भात, भुईमूग, मिरची, नाचणी, ज्वारी इत्यादी पिके असून ऊस हे बारमाही पीक आहे. गडहिंग्लज तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ४८,११५ हेक्टर इतके आहे. त्यापैकी भात क्षेत्र ७,८२५ हेक्टर, संकरीत ज्वारी ४,३५२ हेक्टर, भुईमूग १६,२०० हेक्टर सोयाबीन ६,२८८ हेक्टर, नागली ५५० हेक्टर, संकरीत मका ६१० हेक्टर, इतर कडधान्ये १८०५ हेक्टर, इतर गळीत धान्ये ५० हेक्टर, कापूस १२० हेक्टर, ऊस ५,५०० हेक्टर असे एकूण पीकक्षेत्र ४३,३०० हेक्टर इतके आहे. याशिवाय फळबाग ३४० हेक्टर, मिरची ११२० हेक्टर, भाजीपाला ६० हेक्टर, गवताखालील क्षेत्र २८५ हेक्टर, पडीक खडकाळ क्षेत्र ९६४ हेक्टर इतके आहे. गडहिंग्लज तालुक्यातील शेतकरी हा अत्यंत कष्टाळू आहे. एकूण भूक्षेत्र पाहता केवळ २० टक्के जमीन ओलिताखाली आहे. ८० टक्के जमीन अद्यापही कोरडवाहू आहे. अलिकडेच चित्री धरणाचा प्रश्न सुटला असल्यामुळे भविष्यकाळात पाण्याखालील क्षेत्राचे प्रमाण वाढून शेती उत्पादनात वाढ होईल यात शंका नाही. ४

## गडहिंग्लज तालुक्यातील जमीन मालकीचा प्रश्न

गडहिंग्लज तालुक्यात मोठया प्रमाणात देवस्थानची जमीन आहे. छत्रपती शाहूंची जमीन ही या तालुक्यात आहे. त्याला "श्रीनायकी" असे म्हणतात. गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी भागात कुपेकर, नेसरीकर सांबरेकर, बिद्रीकर, कुंभ्रीकर, सरोलीकर ह्या पाच इनामदारांची सुमारे अडीच हजार हेक्टर जमीन आहे. त्या भागातील अनेक शेतकरी या जमिनीवरच उदरनिर्वाह करतात. यातील बरीच जमीन कुळकायद्याने रयतांना मिळाली आहे. कुळाकडून श्री. शंकरराव रणनवरे यांनी जमिनी काढून घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे संतापलेल्या जनतेने सन १९६९ साली हत्या-

कांड घडवून पाच लोकांना जिवंत जाळून मारले. यातूनच नेसरी भागात पोलीस स्टेशनचा जन्म झाला.

गडहिंग्लज तालुक्यातील मुगळी पाटील, जरळी पाटील, भडगाव पाटील, कडलगे पाटील, दुंडगे पाटील, यांच्या मालकीची सुमारे तीन हजार हेक्टर जमीन आहे. गडकरी, इनामदार म्हणून नूलचे शिंदे चव्हाण, हनिमनाळचे नलवडे, चिंचेवाडीचे कदम यांना छत्रपती शाहूनी मोठया प्रमाणात इनामी जमिनी दिल्या आहेत. गडहिंग्लज तालुक्यातही कुळकायधाने अनेक रयतांना जमिन मिळाली आहे. [५]

## कुळकायदा आणि जमीन सुधारणेचा परिणाम

जमीनदारी पध्दतीत जमीनदार हा जमिनीचा मालक असतो, परंतु जमीन कसण्याचे काम कुळांना करावे लागते. जमीनदार आपली जमीन कसण्यासाठी कुळांकडे देतो. पण कुळांना कसलेही हक्क मिळालेले नसतात. त्यामुळे जमीनदार कुळांचे मोठया प्रमाणावर आर्थिक शोषण करु शकतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात कुळांच्या हितसंबंधाचे रक्षण करुन त्यांचे आर्थिक शोषण थांबविण्याच्या बाबतीत येथील परकीय सत्तेने विशेष हालचाल केली नाही. तथापि, इ.स. १९३५ च्या भारतविषयक कायद्यान्वये भारतात इ.स. १९३७ पासून प्रांतिक स्वायत्ततेचा प्रयोग सुरु झाल्यावर आठ प्रांतात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. या मंत्रिमंडळांनी आपापल्या प्रांतात कुळांना संरक्षण देण्यासाठी काही कायदे केले. त्यामुळे कुळांना थोडयाबहुत प्रमाणात संरक्षण मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र या प्रश्नाला जोराची चालना मिळाली. कॉंग्रेस पक्षाने इ.स. १९४७ मध्ये जमीन विषयक बाबींचा

विचार करण्यासाठी "शेती सुधारणा समिती"ची नियुक्ती केली. या समितीने आपल्या अहवालात असे आग्रहपूर्वक सांगितले की, शेती विकास घडवून आणण्यासाठी शेतीतील दुर्बल घटकांना संरक्षण दिले पाहिजे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीच्या विकासाला प्राधान्य देण्यात आल्याने या योजनेने महत्वाच्या शेतीविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार केला होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेने कुळांना संरक्षण देण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या होत्या.

१) कुळाने जमिनीच्या मालकाला द्यावयाचा खंड एकूण उत्पन्नाच्या १/६ इतका असावा.

२) कुळाने मालकाला विशिष्ट रक्कम एकदम किंवा हप्त्या-हप्त्याने द्यावयाची तयारी दर्शविली तर कुळाला जमीन मालकाकडून जमीन विकत घेण्याचा हक्क देण्यात यावा.

३) जमीन मालकाची स्वत: जमीन कसावयाची तयारी असल्यास त्याला विशिष्ट मुदतीपर्यंत व मर्यादित प्रमाणात कुळाकडून जमीन परत घेण्याविषयी परवानगी देण्यात यावी.

कुळांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी घटक राज्यांच्या सरकारांनी अनेक कायदे केले आहेत. या कायद्याची उद्दिष्टे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे होती.

१) कुळांच्या हक्कांचे संरक्षण करणे.

२) जमीन मालकांना कुळाकडून देण्यात येणाऱ्या खंडावर नियंत्रण ठेवणे.

३) कुळांना त्यांच्याकडे कसण्यासाठी आलेल्या जमिनीची मालकी मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

आतापर्यंत निरनिराळ्या घटकराज्यांनी केलेल्या कुळकायद्यामुळे कुळांच्या हितसंबंधाचे रक्षण होऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली. "कसेल त्याची जमीन" असाच कायदा महाराष्ट्रात झाल्याने कुळांना जमीन मालक होण्याची संधी लाभली आहे. तथापि या कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे व प्रमाणिकपणे झालेली नाही. कुळांना जमिनीवरुन हाकलून लावणे, आपण स्वखुशीने जमीन सोडत आहोत असा कबुलीजबाब कुळांकडून मिळविण्यासाठी त्यांच्यावर दडपण आणणे, जमीन मालकांच्या हितसंबंधासाठी शासकीय यंत्रणेचा वापर होणे यासारखे प्रकार कुळकायद्यांची अंमलबजावणी करताना मोठ्या प्रमाणात झाले होते. भारत सरकारच्या नियोजन आयोगानेही कुळकायद्यामुळे अपेक्षित उद्दिष्ट साध्य न झाल्याचे मत नोंदविले आहे. नियोजन आयोगाच्या मते, या कायद्याच्या अपयशाला त्यातील तरतुदी विषयीचे लोकांचे अज्ञान, कायद्यामधील उणिवा, जमिनीच्या हक्कासंबंधीच्या नोंदीचा अपूरेपणा व सदोष शासनव्यवस्था या गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत झाल्या आहेत. साहजिकच कुळांना संरक्षण देण्याचा कुळकायद्याचा उद्देश पूर्णांशाने साध्य होऊ शकला नाही.[५] तरीसुध्दा कुळ-कायद्याने कुळे जमिनीचे मालक झाल्याने अत्यंत आत्मीयतेने शेती करण्याची परिस्थिती त्यांना उपलब्ध झाली व जमीनदार सुध्दा कुळ-कायद्याच्या भयाने शेतीकडे लक्ष देऊ लागले.

## गडहिंग्लज तालुक्यातील सहकारी चळवळीची वाटचाल

राजकारण, समाजकारण, उद्योग, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात गडहिंग्लज शहर आणि तालुका महाराष्ट्रात पुढे आहे. सह्याद्रीच्या पठारावर असलेला हा तालुका सातत्याने नवनवीन प्रयोग करणारा तालुका म्हणून ओळखला जातो. हिरण्यकेशी ही या तालुक्याची जीवनदात्री आहे. इथली सुपीक माती, स्वच्छ हवा अनेकांना मोहवते. गडहिंग्लज तालुक्यात सहकाराची पाळेमुळे खोलवर रूजली असल्याने या परिसराच्या सर्वांगिण विकासात या चळवळीचा मोठा वाटा आहे. गावोगावी असलेली विविध कार्यकारी सहकारी संस्था हा त्याचा पाया आहे. शेतक-याच्या आर्थिक विकासात व त्यांच्या सुखदु:खात या सेवा संस्था शेतक-याच्या पाठीशी राहिल्या. गावची सोसायटी शेतक-याच्या जीवनाचे एक अंग बनली. खते, बी-बियाणे, शेतीला लागणा-या अन्य वस्तू येथून शेतक-याला मिळू लागल्या. शेतकरी हाच प्रामुख्याने सहकारी चळवळीचा केंद्र बिंदू आहे.

सामान्यांचे जीवनमान पालटण्याचे सामर्थ्य सहकारात आहे. समाजाच्या उन्नतीसाठी सहकार हाच ऐकमेव पर्याय आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीकडे पाहिले तर त्याचे प्रत्यंतर येते. आज मात्र सहकार चळवळीत अनिष्ट प्रवृत्ती वाढताना दिसतात. केंद्र शासनाचे नवे आर्थिक धोरण सहकारी चळवळीला मारक ठरणारे आहे. या परिस्थितीत सतर्क राहून सहकार चळवळीतील दोष दूर केले पाहिजेत असे मत गडहिंग्लज साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब नलवडे यांनी मांडले.

यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक क्रांतीसाठी सहकार चळवळ हेच प्रभावी माध्यम असल्याचे मत मांडून महाराष्ट्रातील सहकारी

चळवळीला त्यांनी उभारी दिली. गडहिंग्लज तालुक्यातील सहकारी साखर कारखान्याने ऊस उत्पादनाला चालना मिळाली. त्या अनुषंगाने इतर उद्योग सुरु झाले. अनेकांना रोजगार मिळाला. सहकार चळवळीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट बनली आहे. औद्योगिक वातावरण निर्मिती करण्यात सहकाराचा मोठा वाटा आहे. [७]

**गडहिंग्लज तालुक्यातील सहकारी संस्था**

| अ.नं. | संस्थेचे नांव | संस्था ३१ मार्च,१९९५ अखेर |
|---|---|---|
| १) | वि.का.स. सेवा संस्था | ७७ |
| २) | प्राथमिक सहकारी नागरी बँका | ३ |
| ३) | पगारदार सेवकांची सहकारी पतसंस्था | १४ |
| ४) | नागरी सहकारी पतसंस्था | ११६ |
| ५) | गडहिंग्लज तालुका खरेदी विक्री संघ लि.गडहिंग्लज | १ |
| ६) | प्राथमिक फळे भाजीपाला प्रक्रिया संस्था | ४ |
| ७) | प्राथमिक हातमाग लोकर संस्था | १ |
| ८) | प्राथमिक यंत्रमाग कापूस संस्था | २ |
| ९) | प्राथमिक कुंभार औद्योगिक सहकारी संस्था | २ |
| १०) | इतर ग्रामीण उद्योग | २ |
| ११) | उपसा जलसिंचन योजना | १३ |
| १२) | कोल्हापूर जिल्हा मिरची उत्पादक सहकारी संघ लि.गड. | १ |
| १३) | इतर औद्योगिक संस्था | ९० |
| १४) | सहकारी सूत गिरण्या | २ |
| १५) | मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार संस्था | २ |
| १६) | प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे | ७ |
| १७) | गृहनिर्माण संस्था | ९ |
| १८) | इतर गृहतारण संस्था | २ |
| १९) | मजूर सहकारी संस्था | ३ |
| २०) | वाहतूक संस्था | १ |
| २१) | तालुका सुपरवायझर युनियन | १ |
| २२) | पाणीपुरवठा संघ तालुका पातळीवरील | १ |
| २३) | दुग्ध संस्था | १०० |

८

गडहिंग्लज तालुक्यात सहकारी चळवळीला पोषक असे वातावरण आहे. या वातावरणाला अनुकूल पावले उचलणे गरजेचे आहे. गडहिंग्लज तालुक्यात झालेली प्रगती समाधानकारक आहे कां ? या प्रश्नाचा शोध घेताना मात्र मिळणारे उत्तर संमिश्र आहे. केवळ संख्यात्मक निकष लावून सहकारी क्षेत्राचे मूल्यमापन करणे चुकीचे ठरते. गडहिंग्लज तालुक्याची क्षमता लक्षात घेता आणखी वेगाने विकास व्हावयास हवा होता. सहकारी क्षेत्रात मोठमोठे प्रकल्प निर्माण होणे गरजेचे होते. पण तसे घडले नाही. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे तालुक्याला सर्वसमावेशक असे खंबीर नेतृत्व लाभलेले नाही हेच होय. संपूर्ण तालुक्याला रचनात्मक दिशा देण्यासाठी व सर्व गटांना एकत्रित घेऊन जाणारा नेता असणे ही तालुक्याच्या आर्थिक विकासासाठी अत्यंत गरजेची गोष्ट आहे. तरच मुक्त अर्थव्यवस्थेच्या वावटळीतही गडहिंग्लज तालुक्यातील सहकारी चळवळीची वाटचाल तितक्याच वेगाने होऊ शकेल.[९]

## गडहिंग्लज तालुक्याचे राजकारण

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाचा आढावा घेतला असता आपणास लक्षात येते की, कॉंग्रेस अंतर्गत गटबाजीमुळे विरोधी पक्षाच्या उमेदवारांना अधूनमधून संधी मिळत गेली आहे. प्रत्येक वेळी नवीन चेहऱ्याची मागणी करणारा हा मतदार संघ आहे. याला अपवाद फक्त डॉ.एस.एस. घाळी आणि ॲड. श्रीपतराव शिंदे हे आहेत. १९५७, १९६७, १९८५, १९९० या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षाने बाजी मारली आहे. गडहिंग्लज तालुका विधानसभा मतदारसंघातून पुढीलप्रमाणे उमेदवार विजयी झाले आहेत.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | राजकीय पक्ष | विधानसभा निवडणूक वर्ष |
|---|---|---|---|
| १. | श्री. म.दुं. श्रेष्ठी | काँग्रेस | १९५२ |
| २. | श्री. डी.एस्. नार्वेकर | शेतकरी कामगार पक्ष | १९५७ |
| ३. | श्री. आप्पासाहेब नलवडे | काँग्रेस | १९६२ |
| ४. | श्री. तुकाराम कोलेकर | शेतकरी कामगार पक्ष | १९६७ |
| ५. | श्री. बी.एस्. पाटील | काँग्रेस | १९७२ |
| ६. | डॉ. शिवलिंग शिवयोगी घाळी | काँग्रेस (आय) | १९७८ |
| ७. | डॉ. शिवलिंग शिवयोगी घाळी | काँग्रेस (आय) | १९८० |
| ८. | ॲड.श्रीपतराव दिनकरराव शिंदे | जनता पक्ष | १९८५ |
| ९. | ॲड.श्रीपतराव दिनकरराव शिंदे | जनता दल | १९९० |
| १०. | श्री.बाबासाहेब कुपेकर उर्फ कृष्णाराव रखमाजीराव देसाई | काँग्रेस (आय) | १९९५ |

गडहिंग्लज मतदार संघात काँग्रेस उमेदवार निवडून आणणे सहज शक्य आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्था व सर्व सहकारी संस्था काँग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत. तळागाळातले सर्व कार्यकर्ते काँग्रेस पक्षाच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत. तथापि काँग्रेसमधील नेत्यांच्या खुर्ची आणि सोयीच्या राजकारणाने काँग्रेसची पिछेहाट झाली. या तालुक्यात

काँग्रेसकडे एकमुखी नेतृत्व नाही. कार्यकर्ते दिशाहीन बनले. प्रत्येकजण स्वत:ला नेता म्हणून वावरु लागला. त्यातूनच काँग्रेसची चिरफाड झाली. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात सलग दोन वेळा जनता दलाचे झुंझार उमेदवार ॲड. श्रीपतराव शिंदे यांना विधानसभेवर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. [१०]

शिवसेनेच्या वाढत्या हालचालीने काँग्रेस (आय) सह सर्वच राजकीय पक्षांची मंडळी हवालदिल झाल्याचे चित्र पाहायला मिळते. गडहिंग्लज विभागात गेल्या पाच-सहा वर्षांच्या काळात शिवसेनेने आपली संघटना वाढविण्याचा प्रयत्न चालविला आहे. गावोगावी शाखा स्थापन झाल्या आहेत. शिवसेनेचे राजकारण काही असले तरी तरुण मंडळींना शिवसेने-विषयी आकर्षण आहे. शिक्षण घेणारी, शिक्षण घेऊन बाहेर पडलेली, उद्योगधंदा करणारी, नोकरीचा शोध घेणारी अशी सर्वच तरुण मंडळी शिवसेनेकडे आकर्षित होत आहेत. लोकांची गाऱ्हाणी, तक्रारी निवार-ण्याची छोटी छोटी कामे करुन शिवसेना हळूहळू तालुक्यात ताकद वाढवित आहे.

१) <u>गडहिंग्लज तालुक्यातील राजकारण</u> (इ.स. १९५२ ते १९६२)

१९५२ साली मुंबई विधिमंडळाच्या गडहिंग्लज मतदार संघातून काँग्रेस उमेदवार श्री. म.दुं. श्रेष्ठी हे प्रचंड बहुमताने निवडून आले. श्री. म.दुं. श्रेष्ठी हे सुरवातीपासून प्रजापरिषद कार्यकारिणी सदस्य होते. त्यांचा खादी-प्रचार, ग्रामोद्योग अशा कार्यावर त्यांचा भर होता. कोल्हापूर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष व जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले होते. संस्थान विलिन झाल्यानंतर सरकारने त्यांना

विधिमंडळावर नियुक्त केले होते.[११] कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही काम केले. १९३९ मध्ये कुपवाड येथील प्रजापरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे ते उपाध्यक्ष होते. त्यावेळी अटक झाली. १९४२ मध्ये राधानगरी सबजेलमध्ये ५ महिने स्थानबध्द होते. संस्थानावरील इंग्रजी वर्चस्वाचे प्रतीक रेसिडेंट कचेरी बंद करण्याबाबत सत्याग्रहात ५००/- रु. दंडाची शिक्षा झाली होती. १९४६ साली अकरा दक्षिणी संस्थानांचे संघराज्य बनविण्याच्या परिषदेत पुणे येथे उपस्थिती होती. मिरज येथे पूर्वी निघणाऱ्या "ज्योति" दैनिकाचे ते एक संपादक होते.[१२]

१९५२ ची गडहिंग्लज विधानसभा मतदार संघाची निवडणूक

एकूण मतदान - ५७,७५८, झालेले मतदान - ३९,९७१
एकूण बाद मते - ९.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | एकूण मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. म.दुं. श्रेष्ठी | कॉंग्रेस | १८,४१९ |
| २) | श्री. र.बा. देसाई कुपेकर | स्वतंत्र शे.का.प. पुरस्कृत | १०,७३३ |
| ३) | श्री. डी.एस्. नार्वेकर | स्वतंत्र | ५,५१४ |
| ४) | श्री. बी.ए. माने | समाजवादी | ४,८७१ |
| ५) | श्री. एस्.जी. चव्हाटे | स्वतंत्र | ४२५ |

१९५२ च्या वरील गडहिंग्लज विधानसभा मतदार संघातून श्री. म.दुं. श्रेष्ठी हे विजयी झाले. १९५२ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीसाठी

कोल्हापूर - सातारा मतदार संघातून सर्वसाधारण जागेसाठी स्वतंत्र उमेदवार बॅ. बाळासाहेब खर्डेकर हे विजयी झाले. त्यांच्या विरोधी श्री. रत्नाप्पा कुंभार काँग्रेस व वसंतराव बागल हे समाजवादी पक्षाचे उमेदवार यांनी निवडणूक लढविली होती. स्वतंत्र उमेदवार बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांना २२२८६४ इतकी मते पडली तर विरोधी उमेदवार श्री. रत्नाप्पा कुंभार काँग्रेस यांना १६३४१९ तर समाजवादी पक्षाचे वसंतराव बागल यांना ६१,१२८ इतकी मते पडली. याच कोल्हापूर - सातारा मतदार संघातून राखीव जागेवर काँग्रेसचे श्री. के.एल. मोरे हे निवडून आले. राखीव जागेचे उमेदवार श्री. के.एल. मोरे यांना १,४५,५९५ इतकी मते पडली तर विरोधी उमेदवार श्री. भोळे (शे.का.पक्ष) यांना १,२४,८८३ इतकी मते मिळाली. बॅ. माने (द.पु. पक्ष) उमेदवार यांना १,१३,७२९ इतकी मते मिळाली. [१३]

१९५२ च्या निवडणुकीत काँग्रेस व इतर पक्षांनी सत्ताप्राप्तीसाठी निवडणुकीचे राजकारण करण्यास सुरुवात केली आणि त्यातून पक्षपध्दती अस्तित्वात आली. १९५२ साली केंद्रात आणि सर्व राज्यात काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. मराठी भाषिक प्रदेशापुरते बोलायचे झाल्यास मुंबई प्रांत मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशात काँग्रेसला ३०१ पैकी २४४ जागा मिळाल्या. सर्व काँग्रेसेत्तर पक्षाला मिळून ५७ जागा मिळाल्या. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या शेकापला २५ जागा मिळाल्या. याचा अर्थ असा की काँग्रेसचे निर्विवाद प्रभुत्व प्रस्थापित झाले. असे असतांनाही राज्याची भाषावार पुनर्रचना करताना मराठी भाषिकांवर अन्याय झाल्याने काँग्रेसची लोकप्रियता प्रचंड वेगाने कमी झाली. १९५६ साली काँग्रेस पक्षास सत्तेवरून दूर करण्याकरिता सर्व काँग्रेसेत्तर पक्षांची

एकजूट होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीची १९५६ साली स्थापना झाली. म्हणजेच प्रादेशिक संघटनेचे फार मोठे आव्हान कॉंग्रेससमोर उभे राहिले.

१९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत कॉंग्रेसला २६४ पैकी १३५ तर संयुक्त महाराष्ट्र समितीच्या घटक पक्षांना १२९ जागा मिळाल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीस मराठी भाषिक भागात निर्विवाद बहुमत मिळाले नाही. कारण विदर्भ आणि मराठवाडयात घटकपक्षांची एकजूट होऊ शकली नाही. गुजराथी भाषिक भागात कॉंग्रेसला भरघोस मते मिळाल्याने द्विभाषिक मुंबई राज्यात कॉंग्रेस पक्षाच सत्तेवर कायम राहिला असे असले तरीही विधिमंडळात प्रबळ विरोधी पक्ष अस्तित्वात आला. [१४]

१९५७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी गडहिंग्लज मतदार संघातून कॉंग्रेसतर्फे पुढे आलेल्या नावात डॉ. एस.एस. घाळी यांना यशाची हमखास खात्री होती. पण ते आपल्या गटात बसत नाहीत म्हणून त्यांना डावलण्यात आले. १९५७ च्या निवडणूकीनंतर श्री. रत्नाप्पा कुंभार हे मंत्री होणार आहेत अशी चर्चा होती म्हणून विधानसभेकरिता ते उभे राहू इच्छित होते. लोकसभेवर जाण्यास ते नाखूष होते. श्री. म.दुं. श्रेष्ठी हे देखील विधानसभेला उभे राहिले तर मंत्र्याची जागा आपल्या वाटयास येणार नाही या समजुतीने श्री. रत्नाप्पा कुंभार हे श्री. म.दुं. श्रेष्ठी यांना लोकसभेवर पाठविण्याच्या प्रयत्नात लागले. डॉ. घाळी यांना विधानसभा निवडणुकीसाठी उभे करावे असे लोकमत होते. पण श्री. म.दु. श्रेष्ठी यांनी स्वतः उभे राहण्याचे कबूल करुन ऐनवेळी कॉंग्रेसतर्फे गडहिंग्लज विधानसभा मतदारसंघासाठी श्री. बी.एस. पाटील यांचे नांव पुढे केले. त्यामुळे सर्व कार्यकर्ते व व्यापारी मंडळी नाखूष झाली. नाकदुऱ्या, माफी वगैरे सर्व प्रकार झाल्यावर कसेतरी या मंडळीचा पाठिंबा

मिळविण्यात आला. परंतु हे सहकार्य हार्दिक नव्हते. हे निवडणूक निकालानंतर स्पष्ट झाले. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे श्री. डी.एस्. नार्वेकर यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती पुरस्कृत उमेदवार म्हणून निवडणूक लढविली याच भागातील श्री. डी.ए. शिंदे यांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती.

१९५७ च्या गडहिंग्लज विधानसभा मतदार संघातून संयुक्त महाराष्ट्र पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री. डी.एस्. नार्वेकर हे निवडून आले. श्री. डी.एस्. नार्वेकर हे मुंबईत १५ वर्षे गिरणी कामगार होते. हे काम करीत त्यांनी कामगार चळवळीतही काम केले होते. शेतकरी कामगार पक्षाचे चांगले काम करीत होते. सत्यशोधक समाजाचेही त्यांनी खेडया-पाडयात काम केले होते. त्यांनी गडहिंग्लज भागात लोकजागृतीचे काम केले होते. १९५२ च्या निवडणूकीत त्यांनी गडहिंग्लज मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढविली होती. पण ते निवडून आले नाहीत. १९५७ च्या विधानसभा निवडणूकीत मात्र ते विजयी झाले. कॉंग्रेस उमेदवार श्री. बी.एस्. पाटील व स्वतंत्र उमेदवार श्री. डी.ए. शिंदे यांना त्यांनी पराभव केला.

१९५७ ची गडहिंग्लज विधानसभा मतदार संघाची निवडणूक

पुरुष मतदार - ३०,१४०, स्त्री मतदार - ३०,४७९,

मतदान केंद्रे - ८५, एकूण मतदार संख्या - ६०,६१९

झालेले मतदार - ३६,३४४

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | निशाण | एकूण मते |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. डी.एस्. नार्वेकर | शेकाप (सं.म.स.पुरस्कृत) | खटारा | १७,०५६ |
| २) | श्री. बी.एस्. पाटील | कॉंग्रेस | बैलजोडी | १४,४७८ |
| ३) | श्री. डी.ए. शिंदे | स्वतंत्र | कोंबडा | ४,७१० |

१५

१९५२ च्या निवडणुकीत कोल्हापूर - सातारा मतदार संघातून सर्वसाधारण जागेकरिता कॉंग्रेसतर्फे श्री. रत्नाप्पा कुंभार व विरोधी पक्षाच्या पुरस्काराने स्वतंत्र उमेदवार म्हणून बॅ. बाळासाहेब खर्डेकर हे उभे होते. त्यात बॅ. खर्डेकर हे प्रचंड बहुमताने निवडून आले होते. या खेपेस श्री. रत्नाप्पा कुंभारांनी लोकसभेच्या निवडणूक क्षेत्रातून पळ काढला. आपल्या ऐवजी त्यांनी श्री. म.दु. श्रेष्ठी यांना उभे केले. श्री. म.दु.श्रेष्ठी हे काहीसे भले गृहस्थ होते. परंतु गेली आठ वर्षे ते मुंबई विधानसभेचे सभासद असूनही त्यांनी तेथे काही भरीव कार्य केल्याचा दाखला नाही. शिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर राजीनामे देण्याचा प्रश्न निर्माण झाला असता त्यांनी माघार घेतली. त्यामुळे त्यांना सर्व भागात पाठिंबा मिळण्या-ची शक्यता नव्हती. बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांनी १९५७ ची लोकसभा निवडणूक पुन्हा लढविली. संयुक्त महाराष्ट्र पुरस्कृत शे.का.प.चे भाऊ-साहेब महागांवकर यांनीही लोकसभा निवडणूक लढविली. राखीव जागेसाठी

सं.म.स. चे श्री. एस्.के. डिगे, श्री. के.एल्. मोरे कॉंग्रेस, स्वतंत्र उमेदवार शामराव जाधव यांनी निवडणूक लढविली होती.

१९५७ च्या कोल्हापूर मतदार संघातून सर्वसाधारण जागेसाठी संयुक्त महाराष्ट्र समितीचे श्री. भाऊसाहेब महागांवकर यांना २,३०,९४५ मते पडून विजयी झाले, तर स्वतंत्र उमेदवार बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांना १,३०,७३३ इतकी मते पडली. श्री. म.दुं. श्रेष्ठी कॉंग्रेस उमेदवार यांना ९७,९६६ मते पडली. बॅ. बाळासाहेब खर्डेकर व श्री. म.दुं. श्रेष्ठी यांचा पराभव झाला. राखीव जागेचे उमेदवार श्री. एस्.के. डिगे संयुक्त महाराष्ट्र समिती यांना २,६९,६०५ मते पडून विजयी झाले. तर पराभूत उमेदवार श्री. के.एल्. मोरे कॉंग्रेस यांना १,२६,५४४ व स्वतंत्र उमेदवार श्री. शामराव जाधव यांना ४०,४५१ इतकी मते मिळाली. [१६]

१९६० साली संयुक्त महाराष्ट्र स्थापनेनंतर कॉंग्रेसने विरोधी पक्षातील बहुजन समाजातील नेत्यांना आपल्याकडे वळविले. त्यामुळे १९६०-६२ या कालखंडात कॉंग्रेसचे संख्यात्मक बल उत्तरोत्तर वाढत गेले. १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झंझावाती वादळात कॉंग्रेस पक्षाचे पानिपत झाले होते. १९५७ साली खंडित झालेले कॉंग्रेसचे निर्विवाद प्रभुत्व १९६२ साली पुन्हा एकदा प्रस्थापित झाले. विधानसभेच्या २६४ पैकी २१५ जागा कॉंग्रेसला तर सर्व विरोधी पक्षांना मिळून ३९ जागा मिळाल्या. [१७] महाराष्ट्रातील जनतेने कॉंग्रेस पक्षावर विश्वास दाखवून सेवेची आणखी संधी दिली आहे. असे उद्गार नाम. यशवंतराव चव्हाण यांनी काढले.

गडहिंग्लज मतदार संघातून १९६२ साली विधानसभेसाठी कॉंग्रेस पक्षामार्फत श्री. पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे यांना उमेदवारी मिळाली.

१



श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी १९४२ च्या स्वातंत्र्यलढयात भाग घेतला होता. त्यांचा मूळचा पिंड शेतकरी होता. वकिली करीत असताना प्रत्यक्ष शेतक-यांशी व गरीब जनतेशी घनिष्ठ संबंध होता. शेतकरी समाजाची सर्वांगीण उन्नती व्हावी व ग्रामीण जनता सुधारावी याकरिता त्यांनी श्रमदानाचे महत्त्व पटवून देऊन ब-याच ठिकाणी रस्ते करणे, शाळा इमारती, सार्वजनिक विहीरी व देवालये बांधणे वगैरे लोकोपयोगी कामे केली होती. बरीच वर्षे कोल्हापूर जिल्हा विकास मंडळाचे व देवस्थान मंडळाचे सभासद होते. तालुक्यातील शेतीचा विकास होण्याच्या दृष्टीने तालुक्यातून वाहणा-या हिरण्यकेशी नदीवर ऐनापूर, गिजवणे व निलजी येथे पक्की धरणे बांधून पाणीसाठी प्रयत्न केले. गरीब मुलांना शिक्षण मिळावे यासाठी तालुक्यातील प्रमुख गावात हायस्कूल्स सुरु करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर मार्फत गडहिंग्लज येथे हायस्कूल सुरु करण्यासाठी प्रामुख्याने प्रयत्न केले होते. श्री. शिवाजी वसतिगृहाचे ते कार्याध्यक्ष होते. तालुक्यातील कडगांव, हसूरचंपू, मुगळी, वगैरे ठिकाणी हायस्कूल काढण्यास मदत केली होती. तालुका कॉंग्रेस दोन वर्षे सरचिटणीस व नंतर अध्यक्ष म्हणून प्रभावी काम केले होते. जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सदस्य असून कार्यकारिणीतही होते. या निरनिराळ्या क्षेत्रातून जात असतांना श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी कॉंग्रेसच्या उच्च ध्येयधोरणाचापुरस्कार केला. [१८]

१९६२ च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस उमेदवार श्री.पी.आर. उर्फ आप्पासाहेब नलवडे यांना विरोध करण्यासाठी प्रजासमाजवादी पक्षाचे श्री. एस्.एम्. खन्ना आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे श्री. डी.एस्.नार्वेकर हे दोन उमेदवार उभे होते. गेल्या १९५७ च्या निवडणुकीत या मतदार

संघातून श्री. डी.एस्. नार्वेकर निवडून आले होते. पण या निवडणुकीत त्यांना यशाची बिलकूल आशा नव्हती. म्हणून खरी लढत श्री.आप्पासाहेब नलवडे व श्री. एस्.एम्. खन्ना यांच्यातच होती. या तालुक्यात प्रजासमाजवादी पक्षाचे ५/१० सभासद नव्हते. तरीसुध्दा काही लोकांच्या पाठिंब्यावर श्री. खन्ना निवडणूक लढविली होती. गडहिंग्लजला बॅ. नाथ पै यांचे भाषण झाले त्यात त्यांनी लायक उमेदवाराचाच पुरस्कार केला होता. उमेदवार लायकीच्या दृष्टीने श्री. आप्पासाहेब नलवडे योग्य उमेदवार होते. श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या विजयात निपाणीचे उद्योगपती श्रीमान देवचंद शहा यांचाही मोठा वाटा होता.

१९६२ ची गडहिंग्लज विधानसभा मतदार संघाची निवडणूक

एकूण झालेले मतदान - ४१,८८३ एकूण बाद मते - २,५०८

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | एकूण मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. पी.आर.उर्फ आप्पासाहेब नलवडे | काँग्रेस | २२,०७४ |
| २) | श्री. डी.एस्. नार्वेकर | शेकाप सं.म.समिती पुरस्कृत | १०,०५९ |
| ३) | श्री. एस्.एम्. खन्ना | प्रजा समाजवादी | ५,२४३ |

या निवडणुकीत श्री. आप्पासाहेब नलवडे हे १२ हजार मते अधिक पडून निवडून आले.

१९६२ साली झालेल्या कोल्हापूर जिल्हा लोकसभा मतदार संघातील एक सर्वसाधारण व दुसरी राखीव अशा दोनही जागांवर कॉंग्रेस पक्षीय उमेदवार श्री. व्ही.टी. पाटील व श्री. के.एल्. मोरे प्रचंड बहुमताने निवडून आले. १९५२ व १९५७ सालच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी कॉंग्रेस पक्षाला दोन्ही जागा एकदाही मिळाल्या नव्हत्या. इतकेच नव्हे तर लोकसभेची सर्वसाधारण जागा कॉंग्रेस पक्षाने मिळविण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. श्री. व्ही.टी. पाटील यांनी आपले प्रतिस्पर्धी उमेदवार श्री. भाऊसाहेब महागांवकर शे.का.प. समिती यांचा ६३,६६९ मतांनी पराभव केला.

१९६२ ची कोल्हापूर जिल्हा सर्वसाधारण व राखीव मतदार संघातील तपशील पुढीलप्रमाणे आहे.

### कोल्हापूर जिल्हा सर्वसाधारण मतदार संघ

एकूण मतदार संख्या - ३,२३,४६४, झालेले मतदान - २,४४,४३७

बाद मते - १०,५२०

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | एकुण मतदान |
|---|---|---|---|
| १) | श्री. व्ही.टी. पाटील | कॉंग्रेस | १,४४,८५६ |
| २) | श्री. भा.रा. महागांवकर | शे.का.प.समिती | ८१,१८७ |
| ३) | श्री. एल्.एम्. चव्हाण | स्वतंत्र | ७८७४ |

कोल्हापूर जिल्हा लोकसभा राखीव मतदार संघ

एकूण मतदार संख्या - ४,१५,७३७, झालेले मतदान - ३,६०,१९५
बाद मते - १२,३५१

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | एकूण मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. के.एल्. मोरे | कॉंग्रेस | १,६४,५८५ |
| २) | श्री. दा.म. शिर्के | रि.प.समिती | ६४,९०२ |
| ३) | श्री. शामराव जाधव | स्वतंत्र | १०,९५० |
| ४) | श्री. बापूसाहेब ज्ञानदेव कांबळे | | ७,४०७ |

श्री. के.एल्. मोरे हे ९९,६८९ मतांनी विजयी झाले. [२०]

## २) गडहिंग्लज तालुक्यातील राजकारण (इ.स. १९६२ ते १९७८)

इ.स. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर प्रादेशिक राजकारणात अनेक बदल झाले. जुने पुढारी जाऊन नवे नेतृत्व पुढे आले. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात कृषि-औद्योगिक समाज प्रस्थापित करण्याचे ठरविले. १९६२ साली त्यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारले व पंचायत राज्याची स्थापना केली. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या त्रिस्तरीय पातळीवर पंचायती राज्य उभारण्यात आले होते. या पंचायती राज्यातूनच नवीन-नवीन पुढारी उदयास येऊ लागले. त्याबरोबर सहकारी संस्था, कारखाने यांचीही निर्मिती होऊ लागली. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, खरेदी विक्री संघ, सहकारी सोसायटया, जिल्हा

मध्यवर्ती बँका इ. संस्था जिल्ह्यातील राजकारणाची प्रमुख केंद्र बनल्या. यातूनच नवे नेतृत्व पुढे आले. याच काळात यशवंतराव चव्हाण यांनी "येती महाराष्ट्राची दहावर्षे" हे पुस्तक लिहून महाराष्ट्राच्या विकासाचा आराखडा मांडला.[२१] सन १९६० ते १९६७ या काळात महाराष्ट्रात विशेषत: ग्रामीण भागात काँग्रेसचे मोठे वर्चस्व निर्माण झाले. पंचायत राज्य संस्था, सेवा सहकारी संस्था, सरकारची ग्रामीण विकासाची वेगवेगळी धोरणे आणि सहकारी साखर कारखान्याची स्थापना यामुळे ग्रामीण भागाचे कल्याण झाले. विकासाचा वेग वाढला, शिक्षणाचा प्रसार झाला आणि सत्ता ख-या अर्थाने बहुजन समाजाच्या हातात आली. सन १९६६-६७ युध्दोत्तर काळात संपूर्ण महाराष्ट्र समितीचा फारसा प्रभाव पडला नाही. काँग्रेसची इतरत्र पडझड होत असताना महाराष्ट्राचा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला शाबूत राहिला. मात्र विरोधकांना अनुकूल असणा-या गडहिंग्लज भागात शे.का.प.चा उमेदवार विजयी झाला.

## <u>१९६७ ची विधानसभा निवडणूक</u>

महाराष्ट्रात दि. १५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी १९६७ या काळात विधानसभा निवडणुका झाल्या. १५, १८ व २१ फेब्रुवारी, १९६७ ला मतदान घेण्यात आले. महाराष्ट्रातील जनतेने काँग्रेसला भरघोस पाठिंबा देऊन निवडून दिले. राज्याच्या विकासासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करु असे आश्वासन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी दिले. भारतातील इतर कुठल्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रात काँग्रेस अधिक भक्कम पायावर उभी राहिली. महाराष्ट्रातील काँग्रेस पुरोगामी शक्तीचे प्रतिक आहे. याचा निर्वाळा जनतेने दिला होता. तरी सुध्दा महाराष्ट्रात काँग्रेसचे बहुमत

अल्पप्रमाणात घटले. कारण १९६२ च्या विधानसभा निवडणुकीत २६४ पैकी २१५ जागा काँग्रेसला तर सर्व विरोधी पक्षांना मिळून ३९ जागा मिळाल्या. १९६७ च्या निवडणुकीत २७० पैकी २०३ जागा काँग्रेसला आणि ६७ जागा इतर सर्व विरोधी पक्षांना मिळाल्या.[२२]

गडहिंग्लज मतदार संघातून १९६२ साली काँग्रेसमार्फत श्री. आप्पासाहेब नलवडे हे १२ हजार मते अधिक पडून निवडून आले होते. यानंतर त्यांनी या तालुक्याचा सर्वांगीण विकास करावा यासाठी सतत प्रयत्न केले. गडहिंग्लज येथे औद्योगिक वसाहत स्थापन व्हावे यासाठी प्रयत्न केले. गडहिंग्लज शहरास सतत पाणीपुरवठा व्हावा यासाठी परिश्रम घेतले. गडहिंग्लज तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन म्हणून काही काळ काम केले. गडहिंग्लज मार्केट कमिटी, एस्.टी. डेपो यासाठी प्रयत्न केले. राज्याच्या सहकारी बोर्डावर व इतर अनेक संस्थात सभासद म्हणून काम केले होते. श्री. आप्पासाहेब नलवडे यांनी आमदार म्हणून केलेले कार्य आणि पक्षनिष्ठा पाहून काँग्रेसने १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज मतदार संघासाठी उमेदवारी दिली होती. त्यांच्या विरोधात समिती पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे श्री. तुकाराम कृष्णाजी कोलेकर यांनी निवडणूक लढविली होती. गडहिंग्लज भागात शेतकरी कामगार पक्षाची कामगिरी चांगली होती. शेतकरी वर्गात मार्क्सवादाचा प्रचार करून त्यांची संघटना करण्यासाठी शेतकरी सभा स्थापन केली. दाभाडी येथे सादर करण्यात आलेल्या प्रबंधातील सिध्दांताप्रमाणे १९४८ साली गडहिंग्लज येथील नेसरी येथे शेतकरी परिषद घेऊन या भागात शेतकरी कामगार पक्षाची मुहुर्तमेढ रोवण्यात आली होती.

शेतक-याच्या जीवनाशी अगदी निगडीत असलेल्या लेव्हीच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाने अनेक सभा व परिषदा घेऊन सरकारी

जुलमाविरूद्द शेतक-यांचा आवाज उठवून त्यांना संघटित करण्यात भाई तु.कृ. कोलेकर यांचा यातील वाटा सिंहाचा होता. १९५७ च्या विधान-सभा निवडणुकीत शे.काप्र.चे समिती पुरस्कृत उमेदवार श्री. डी.एस्. नार्वेकर हे गडहिंग्लज मतदार संघातून विजयी झाले होते. गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, पू. विनोबा भावे यांच्या भूदान आंदोलनास विरोध या महत्वाच्या लढयाखेरीज श्रमजीवी जनतेचे अनेक लढे वेळोवेळी भाई तु.कृ. कोलेकर यांनी लढविले होते. शे.का.प.ने केलेल्या या कामगिरीमुळे खेडोपाडी हा पक्ष पोचला होता. ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंतच्या निवडणुकाही पक्षाने लढविल्या. संघर्षाबरोबर शैक्षणिक क्षेत्रातही या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गडहिंग्लज परिसरात चांगले कार्य केले होते. १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज मतदार संघातून शेतकरी कामगार पक्षाचे भाई तुकाराम कृष्णाजी कोलेकर हे विजयी झाले.[२३]

**<u>१९६७ ची गडहिंग्लज तालुका विधान सभा मतदार संघाची निवडणूक</u>**

एकूण मतदार - ७५,२६१, मतदान झाले - ५२,८७२

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | एकूण मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. तुकाराम कृष्णाजी कोलेकर | शे.का.प.समिती पुरस्कृत | २३,६८६ |
| २) | श्री. पी.आर.उर्फ आप्पासाहेब नलवडे | कॉंग्रेस | १९,८६८ |
| ३) | श्री. बसाप्पा मल्लाप्पा चौगुले | स्वतंत्र | १,६३५ |
| ४) | श्री. दत्तात्रय कृष्णाजी दड्डीकर | स्वतंत्र | ४,७५८ |

या निवडणुकीत समिती पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री. तुकाराम कोलेकर यांनी श्री. आप्पासाहेब नलवडे (कॉंग्रेस) यांचा ३८१८ मतांनी पराभव करून विजय मिळविला. म्हणजेच १९५७ ते १९६७ पर्यंतचा गडहिंग्लज तालुक्याचा आपण इतिहास पाहिला असता असे स्पष्ट दिसते की या तालुक्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाव्यतिरिक्त इतर कोणताही पक्ष फार मोठा नावारूपाला आलेला नव्हता किंवा निवडणुकीत आपले उमेदवारही उभे करीत नव्हता. कॉंग्रेसला तुल्यबळ असा शेतकरी कामगार पक्षाच या तालुक्यात होता. १९५७ ते १९६७ या कालावधीतील तीन पैकी दोनवेळा १९६२ चा अपवाद वगळता शेतकरी कामगार पक्षाने कायम राखली होती. १९६७ मध्ये कॉंग्रेसच्या एका गटाची मदत घेऊनच आप्पासाहेब नलवडे यांचा पराभव करून शेतकरी कामगार पक्षाचे तुकाराम कोलेकर निवडून आले.

## गडहिंग्लज तालुक्याची १९७२ ची विधानसभा निवडणूक

१९७२ च्या विधानसभा निवडणूकीत कोल्हापूर जिल्ह्यात कॉंग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर बंडखोरी झाली होती. म्हणून कॉंग्रेसला शेतकरी कामगार पक्षाची धास्ती नसून जी धास्ती होती ती बंडखोर कॉंग्रेस जनांची. कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडमधून श्री. व्ही.के. चव्हाण पाटील, कागल मतदारसंघातून श्री. सदाशिवराव मंडलिक आणि गडहिंग्लज विधानसभा मतदार संघातून श्री. नागाप्पाण्णा बटकडली असे कॉंग्रेसचे जबरदस्त बंडखोर नेते निवडणुकीच्या आखाड्यात होते. ही बंडखोरी पक्षाला तापदायक ठरणारी होती.

गडहिंग्लज मतदार संघातून नव कॉंग्रेसचे उमेदवार श्री. बी.एस्.पाटील यांना तिकिट मिळाले. श्री. बी.एस्. पाटील यांनी वयाच्या १६ व्या वर्षी

हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असतानाच त्यांनी महात्मा गांधीच्या ४२च्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. त्यासाठी त्यांना ९ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. ४ वर्षे शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सुरवातीला प्रजापरिषद व नंतर कॉंग्रेसच्या कार्यात भाग घेतला. कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेसचे सेक्रेटरी म्हणूनही त्यांनी काम केले होते. ते उत्तम प्रशासक म्हणून परिचित होते. अनेक सहकारी संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन म्हणून त्यांनी उत्तम काम केले होते. महाराष्ट्रातील समाजवादी विचारसरणीचे एक प्रभावी कार्यकर्ते म्हणून ते परिचित होते. निर्भिड व उत्तम वक्ते म्हणून ओळखतात. इंदिरा गांधीचे कट्टर पुरस्कर्ते असून त्यांच्या निवडीने गडहिंग्लज भागात उत्साह निर्माण झाला होता. कायद्याचा अभ्यास, समाजवादाची प्रखर निष्ठा, प्रभावी वक्तृत्व, त्यागी वृत्ती, संघटन कौशल्य इत्यादि गुणांनी युक्त असलेल्या श्री. बी.एस. पाटील यांचा नवकॉंग्रेसच्या मोजक्या उमेदवारात समावेश होता.

श्री. बी.एस. पाटील (नवकॉंग्रेस) यांच्या विरोधात १९६७ च्या निवडणुकीत या मतदार संघातून विजयी झालेले समिती पुरस्कृत शेतकरी कामगार पक्षाचे श्री. तुकाराम कोलेकर हे उभे होते. त्यांचे पण या भागात चांगले कार्य होते. पण कॉंग्रेसचे बंडखोर उमेदवार श्री. नागाप्पाण्णा गुं. बटकडली हे निवडणूक लढवित असल्यामुळे अडचणीची परिस्थिती कॉंग्रेसला झाली होती. तरीही या निवडणुकीत सत्तारुढ कॉंग्रेसचे उमेदवार श्री. बी.एस. पाटील हे बंडखोर कॉंग्रेस उमेदवार श्री. नागाप्पा गुरुलिंगाप्पा बटकडली यांचा ६,८७३ मतांनी पराभव करुन विजयी झाले. श्री.बी.एस. पाटील यांना ३०,९९४ मते पडली व श्री. नागाप्पा बटकडली यांना

२४,१२१ मते मिळाली. श्री. बी.एस्. पाटील यांचे दुसरे प्रतिस्पर्धी उमेदवार श्री. तु.कृ. कोलेकर यांना ११,८५० इतकी मते मिळाली.

## १९७२ ची गडहिंग्लज तालुका विधानसभा मतदार संघाची निवडणूक

मतदारांची संख्या - ८७,४९४ झालेले मतदान - ६८,७९२

बात मते - १,८२७

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | एकूण मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. बी.एस्. पाटील | नवकाँग्रेस | ३०,९९४ |
| २) | श्री. नागाप्पा गुरुलिंगाप्पा बटकडली | अपक्ष | २४,१२१ |
| ३) | श्री. तुकाराम कृष्णाजी कोलेकर | शे.का.प. | ११,८५० |

महाराष्ट्रात १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत नवकाँग्रेसला प्रचंड यश मिळाले. विरोधी पक्षांचा पार धुव्वा उडाला होता. २७० पैकी २२२ जागा काँग्रेसला व इतर सर्व विरोधी पक्षांना ४८ जागा मिळाल्या. १९६२ साली यशवंतराव चव्हाण जरी केंद्रीय मंत्रिमंडळात गेले असले तरी १९७५ पर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणावरील त्यांची पकड कायम राहिली. कोल्हापूर जिल्ह्यात नवकाँग्रेसला ८ जागा, शेतकरी कामगार पक्षाला १, अपक्ष बंडखोर काँग्रेस २, असे उमेदवार विजयी झाले होते.

१९७२ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र गुजरात, आंध्र व म्हैसूर राज्यात नव काँग्रेसने देदिप्यमान विजय संपादन केला होता. सर्वत्र इंदिरा लाट निर्माण झाली होती.

## कॉंग्रेस पक्षातील फूट आणि नवकॉंग्रेसचे यश आणि परिणाम

१९५२ ते १९६७ या काळात कॉंग्रेस पक्षाला विरोध करणारा एकही मोठा प्रभावी पक्ष या काळात निर्माण झाला नाही. जे काही राजकीय पक्ष होते ते केवळ आपले अस्तित्व टिकवून कॉंग्रेसला विरोध करीत होते. १९५२ ते १९६७ या काळात ज्या चार सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यात कॉंग्रेस पक्षाला बहुमत प्राप्त झाले होते. परंतु १९६७ पासून कॉंग्रेस पक्षाच्या प्रभावाला उतरती कळा लागली. १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला बहुमत मिळाले, परंतु तिच्या लोकसभेच्या प्रतिनिधी संख्येत मात्र घट झाली. तसेच विविध आठ राज्यात कॉंग्रेसेत्तर मंत्रिमंडळे अधिकारपदावर आरूढ झाली. १९६७ सालापासून कॉंग्रेस पक्षात मतभेदाचे राजकारण सुरु झाले. १९६९ साली राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतभेद विकोपाला गेले. संघटना कॉंग्रेस व सत्तारूढ कॉंग्रेस (इंडिकेट) यांच्या संघर्षातून राष्ट्रपती निवडणुकीस रंग भरला. संघटना कॉंग्रेसने आपला उमेदवार म्हणून श्री. संजीव रेड्डी व सत्तारूढ कॉंग्रेसने आपला उमेदवार श्री. व्ही.व्ही. गिरी यांना निवडणुकीस उभे केले. शेवटी सत्तारूढ कॉंग्रेसचे उमेदवार श्री. व्ही.व्ही. गिरी राष्ट्रपती पदासाठी निवडून आले. यशवंतराव चव्हाण यांनी या दोन्ही पक्षांनी एकत्र यावे म्हणून खूप प्रयत्न केले. परंतु त्यांना यश आले नाही. त्यातूनच कॉंग्रेस पक्षात फूट पडली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली नवकॉंग्रेस पक्ष (इंडिकेट), तर श्री. निजलिंगाप्पांच्या अध्यक्षतेखाली मोरारजी देसाई, स.का. पाटील, कामराज यांच्या सहकार्याने संघटना कॉंग्रेस पक्ष (सिंडीकेट) स्थापन झाला. परंतु खरी कॉंग्रेस कोणती या वादाला तोंड फुटले. इंदिरा गांधीनी समाजवादाचा जोरदार पुरस्कार केला. तरुण तुर्क म्हणविणाऱ्या मोहन धारिया, चंद्रशेखर या नेत्यांनी त्यांना पाठिंबा दिला. चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांची तनखेबंदी, गरिबी

हटाओ अशा विविध उपक्रमामुळे इंदिरा गांधींनी जनमानसात आपल्या पक्षाची चांगली प्रतिमा निर्माण केली. त्याचा परिणाम १९७१ च्या निवडणूकीत होऊन नवकाँग्रेसला भरघोस यश मिळाले.

१९७१ च्या मध्यावधी निवडणुकीत निर्विवाद बहुमत प्राप्त झाल्यामुळे इंदिरा गांधींच्या नवकाँग्रेसला खरी काँग्रेस समजण्यात येऊ लागले. त्याचवर्षी बांगला देशाच्या युध्दाचा प्रसंग उद्भवला. पंतप्रधान इंदिरा गांधींनी बांगला देशाला पाठिंबा व सहकार्य देऊन बांगला देशाच्या निर्मितीत महत्वपूर्ण भूमिका बजावली. त्याचा परिणाम १९७२ च्या विधानसभांच्या निवडणुकीवर झाला. बहुसंख्य घटक राज्यांत नवकाँग्रेस पक्ष सत्तेवर आला. सर्व देशभर काँग्रेस पक्षाचा प्रभाव पुन्हा वाढला आणि इतर सर्व विरोधी राजकीय पक्ष कमकुवत व दुर्बल बनले, परंतु इंदिरा गांधींनी सत्तेचा दुरुपयोग करण्याचा मार्ग स्वीकारला. इंदिरा गांधींच्या प्रभावी नेतृत्वाचे रूपांतर एकाधिकारशाहीत झाले. काँग्रेस पक्षाला आपल्या ध्येयधोरणांचा विसर पडला. सत्तारूढ पक्ष या नात्याने काँग्रेस पक्षाची वाटचाल हुकूमशाही पध्दतीचे चालू झाली. १९७५ साली इंदिरा गांधींनी आणीबाणी घोषित करून वातावरण अधिकच भयग्रस्त आणि गंभीर केले. शासकीय प्रसिध्दी माध्यमांचा गैर-वापर करून सत्तेच्या जोरावर व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी केली. विरोधी पक्षाच्या हजारो नेत्यांना अटक करण्यात आली. त्यामुळे जनमानसात काँग्रेसची प्रतिमा डागळली गेली. अशा परिस्थितीतच संघटना काँग्रेस पक्ष, जनसंघ, समाजवादी पक्ष आणि भारतीय क्रांतिदल हे पक्ष एकत्र येऊन जनता पक्षाचा उदय झाला. [२४]

## इ.स. १९७७ ची लोकसभा निवडणूक आणि त्यानंतरचे राजकारण

भारताची सहावी लोकसभा निवडणूक महत्वाची ठरली. गेली तीस वर्षे या देशात कॉंग्रेसची सत्ता दृढमूल होती आणि त्यात अनपेक्षित असे काहीच नव्हते. कारण लोकशाहीत ज्याला प्रभावी विरोधी पक्ष म्हणतात असा पक्ष येथे अस्तित्वात नव्हता. या निवडणुकीने चार पक्षांची युती झाली आणि त्यातून जनता पक्ष स्थापन झाला. म्हणजे राजकीय मंचावर अखिल भारतीय स्तरावर कॉंग्रेस विरुध्द जनता पक्ष असे समीकरण निर्माण झाले. कॉंग्रेसला तुल्यबळ पक्ष निर्माण झाला.

जनता पक्षाला लोकसभेच्या निवडणुकीत यश लाभल्यास "खुल्या समाजास मुक्त शासन" निर्माण करण्यात येईल असे आश्वासन जनता पक्षाच्या जाहिरनाम्यात दिले. जनता पक्षाने आपल्या १९ कलमी जाहिरनाम्यातून "निर्भयता" निर्माण करण्याचे आणि लोकशाहीचे पुनरुत्पादन करण्याचे आश्वासन दिले. सत्तेचे मोठया प्रमाणावर केंद्रीकरण हे लोकशाहीशी विसंगत आहे. म्हणून आर्थिक व राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणावर जनता पक्षाने भर दिला. स्वातंत्र्य आणि लोकशाहीशी जनतापक्ष निबध्द असून लोकांना भयमुक्त करण्यासाठी मूलभूत स्वातंत्र्य आणि न्यायालयाची हक्कपूर्ण भूमिका याची पुन्हा अंमलबजावणी करण्याचे जनता पक्षाने जाहीर केले. [२५]

१६ मार्च ते २० मार्च, १९७७ पर्यंत संसदीय निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत खरी लढत कॉंग्रेस व जनता पक्ष यांच्यात होती. जनता पक्षाला भरघोस यश मिळाले. जनता पक्षाला निर्विवाद बहुमत मिळाले. ९० वर्षांच्या कॉंग्रेसला दक्षिणेकडील व पश्चिमेकडील राज्यातच यश मिळाले.

लोकसभेतील ५४२ जागापैकी ३०० पेक्षा जनता पक्ष व त्याच्या हितचिंतक पक्षांना मिळाल्या. कॉंग्रेसला १५३ जागावरच समाधान मानावे लागले. अनेक राज्यात कॉंग्रेसचे पानिपत झाले. उत्तर प्रदेश हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता. आतापर्यंत सगळे पंतप्रधान या विभागाने दिले होते, तर या निवडणुकीत या राज्यात कॉंग्रेसचा एकही उमेदवार विजयी झाला नाही. जनता पक्षाच्या या यशामुळे भारतीय राजकारणाला वेगळे वळण लागले.

यावेळी केंद्रात जनता पक्ष सत्तेवर आला. कोल्हापूर जिल्ह्यातील मतदारसंघातील जनता पक्षाने पाठिंबा दिलेले शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री. दाजिबा देसाई व कॉंग्रेसचे उमेदवार श्री. शंकरराव माने यांच्यातील अटीतटीच्या लढतीत श्री. दाजिबा देसाई हे १६५ मतांनी विजयी झाले. कोल्हापूर मतदार संघातून १९७७ ला झालेले लोकसभेचे मतदान खालीलप्रमाणे -

तालिका

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदार | - | ५,७५,००० |
| झालेले मतदान | - | ३,८४,०९५ |
| वैध मते | - | ३,७४,०९८ |
| अवैध मते | - | ९,९९७ |
| मतदान केंद्रे | - | ७३० |

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. दाजिबा देसाई | शेतकरी कामगार पक्ष | १,८६,०७७ |
| २) | श्री. शंकरराव माने | कॉंग्रेस | १,८५,९१२ |
| ३) | श्री. शामराव माळी | अपक्ष | २,१०९ |

श्री. शंकरराव माने हे कोल्हापूर मतदार संघातून १९६७ च्या लोकसभेच्या निवडणुकीत विजयी झाले होते. परंतु १९७७ च्या निवडणुकीत मात्र त्यांना पराभूत करून शेतकरी कामगार पक्षाचे श्री. दाजिबा देसाईंनी निसटता विजय मिळविला.

जनता पक्षाच्या उदयामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातही बदल घडून आला. १९७५ च्या आणीबाणीमुळे काँग्रेस पक्षाची प्रतिमा जनमानसात खालावली होती. लोकसभेच्या या निवडणुकीत महाराष्ट्र काँग्रेसला जबरदस्त धक्का बसला होता. यशवंतराव चव्हाण यांना शह देण्यासाठी श्री. वसंतराव नाईक यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून शंकरराव चव्हाण यांची नियुक्ती इंदिरा गांधींनी केली. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या मर्जीतील उमेदवार पराभूत करण्यासाठी काँग्रेसमधील घटकांकडून प्रयत्न केलेल्याची शक्यता नाकारता येत नाही. महाराष्ट्रात शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक व रिपब्लिकन पक्ष यांच्या मदतीने जनता पक्षाने काँग्रेसला जबरदस्त स्वरूपाचे आवाहन दिले. जनता पक्षाच्या रूपाने देशात नवीन वादळ निर्माण झाले होते. जनता फार मोठ्या प्रमाणात आकर्षित या पक्षाकडे झाली होती. महाराष्ट्रात एकूण ४८ जागापैकी काँग्रेसला फक्त २० जागावर समाधान मानावे लागले. जनता पक्षाने १९ जागा मिळविल्या व इतर ९ जागा शेतकरी कामगार पक्ष व सी.पी.आय.(एम्.) ने मिळविल्या. मुंबई, पुणे, कोकण आणि मराठवाडा विभागात काँग्रेसला फार मोठा पराभव पत्करावा लागला. विदर्भाने मात्र आपल्या काँग्रेसची आघाडी मजबूत ठेवण्यात यश मिळविले.

१९७७ ची महाराष्ट्रात लोकसभा निवडणूक - तालिका

५६

एकूण जागा - ४८

| अ.नं. | पक्षाचे नांव | जिंकलेल्या जागा | मतदान शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | कॉंग्रेस | २० | ४६.३० |
| २) | जनता पक्ष | १९ | ३१.३२ |
| ३) | शे.का.प. | ६ | ६.३० |
| ४) | मा.क.प. | ३ | ३.०२ |
| ५) | इतर | - | १३.०६ |
| | | ४८ | १००.०० |

१९७७ साली १५३ सदस्यांच्या संसदीय कॉंग्रेस पक्षाचे श्री. यशवंतराव हे नेते झाले आणि लोकसभेतही विरोधी पक्षाचे नेते झाले. के.ब्रम्हानंद रेड्डी हे कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सलग ३० वर्षे सत्तेवर असणारा कॉंग्रेस पक्ष कमकुवत विरोधी पक्ष बनला. सुरवातीच्या काळात यशवंतराव चव्हाण - ब्रम्हानंद रेड्डी यांनी इंदिरा गांधीना पक्षात एकटे पाडावयास सुरुवात केली. परंतु इंदिरा गांधीनी आपला अधिकार प्रस्थापित करावयास सुरुवात केली. त्यांनी कॉंग्रेस मधील आपल्या हित-चिंतकांचा पाठिंबा मिळविण्यास सुरवात केली. त्यानंतर इंदिरा गांधीना कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनविण्याचे प्रयत्न सुरु झाले. त्यासाठी ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक भरविण्याची मागणी इंदिरा गांधी यांच्या पाठी-राख्यांनी केली. पण तशी बैठक बोलाविण्यास ब्रम्हानंद रेड्डी यांनी नकार

दिला. १९७७ साली कमकुवत झालेल्या काँग्रेस पक्षात आणखी १९७८ साली आणखी फाटाफूट झाली. यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग यांनी काँग्रेस (रेड्डी) पक्ष स्थापन केला, तर इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस (आय) पक्ष स्थापन झाला. त्यामुळे काँग्रेस पक्षाची स्थिती अधिकच दयनीय झाली.[२७]

सहाव्या लोकसभेच्या या निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्षाच्या झालेल्या पराभवाची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे करता येईल.

१) अखिल भारतीय स्तरावर काँग्रेसला पर्यायी असा तुल्यबळ जनता पक्ष निर्माण झाला. सर्व विरोधी पक्षाच्या एकत्रिकरणामुळे विरोधी पक्ष मजबूत व तेजस्वी बनला. जनता पक्षाच्या वादळात काँग्रेस पक्ष भुईसपाट झाला.

२) काँग्रेस सरकारने आणिबाणी जाहीर केली आणि तिच्या आधारे मौलिक स्वातंत्र्यावर आघात करण्यात आले. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करण्यात आली.

३) शासकांनी किती पाशवी, हिंसक, क्रूर, आंधळी, लहरी व जुलमी वर्तणूक निष्पाप नागरिकांना दिली.

४) वृत्तपत्रे व न्यायालयीन स्वातंत्र्य हिराऊन घेण्यात आले होते.

५) स्वातंत्र्योत्तर काळात १९७७ पर्यंत दिल्लीची सत्ता काँग्रेसच्या हातात राहिली. या निरंकुश सत्तेमुळे काँग्रेस पक्षातही कितीतरी अपप्रवृत्ती निर्माण झाल्या होत्या. त्यादृष्टीने आत्मपरिक्षण करण्याची कॉंगेसला कधी गरजच भासली नाही. लोकशाही जमान्यात अशी उदासिनता समर्थनीय ठरत नाही.

६) नसबंदीची सक्ती हा एक कमालीचा भावनिक प्रश्न होता. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या भावना दुखाविल्या गेल्या. सनदी नोकरवर्गाच्या जुलमशाहीला जनता कंटाळली होती.

७) जनता पक्ष उदयाने भारतीय लोकशाहीचे नवे पर्व सुरू झाले. शहरी, ग्रामीण तसेच मागास भागातील जनता मोठया प्रमाणात या पक्षाकडे आकर्षित झाली आणि कांग्रेस विरोधी मतदान केले.

८) जनता पक्ष आणि युतींनी तरुण पिढीचा पाठिंबा मिळविण्यात यश मिळविले. लोकनायक जयप्रकाश सारख्या प्रभावी नेत्यामुळे तसेच विरोधी पक्षाकडे पट्टीचे व व्यासंगी वक्ते असल्यामुळे जनमत ढवळून निघाले. इंदिरा लाट मागे पडली आणि जनता लाट उसळली. या पक्षाच्या स्थापनेबाबत श्री. मोहन धारीया म्हणाले, "ज्याप्रमाणे श्रीकृष्णाचा जन्म तुरुंगात झाला त्याप्रमाणे जनता पक्षाचा जन्म तुरुंगात झाला.आहे."

९) समाजातील साहित्यिक, वृत्तपत्राचे संचालक, अभिनय क्षेत्रातील अनेकांनी कांग्रेसची दिंडी चोरांच्या आळंदीकडे कशी चालली होती हे जनतेला दाखवून दिले.

१०) जनता पक्षाने "भाकरी व स्वातंत्र्य" या दोन्हीचे हमी दिल्याने बहुजन समाज या पक्षाकडे आकर्षित झाला होता.

## १९७८ च्या विधानसभा निवडणूकापूर्वीचे राजकारण

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीनंतर श्री. शंकरराव चव्हाण यांच्या जागी मुख्यमंत्री म्हणून श्री. वसंतदादा पाटील यांना आणले गेले. वसंतदादा

यांच्यापुढे जनता पक्षाबद्दल रस निर्माण झालेल्या अनेकांची मते कॉंग्रेस पक्षाकडे वळविण्याचे मोठे काम होते. शंकरराव चव्हाणांनी कॉंग्रेस पक्ष सोडला आणि जनता पक्षाशी हातमिळवणी केली. शहरी भागावर आधारीत अशा नेतृत्वामुळे व योग्य ती धोरणे राबविता आली नाहीत त्यामुळे जनता पक्ष साधारण स्थितीत होता. पण जनमताची हवा त्या पक्षाच्या बाजूने होती. महाराष्ट्रातील प्रमुख कॉंग्रेस नेत्यांनी यशवंतराव चव्हाण यांना पाठींबा दिला होता. त्यामुळे कॉंग्रेस (आय) पक्ष हा कमकुवत होता. परंतु विदर्भातील अनेक कॉंग्रेस नेत्यांनी नाशिकराव तिरपुडे यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस (आय) पक्षाशी हातमिळवणी केली. नाशिकराव तिरपुडे महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष झाले.

कॉंग्रेस पक्षास अतिशय मोठया तोटयाची बाब म्हणजे पक्षात पडलेली फूट हे होते. जरी महत्त्वाच्या नेत्यांनी श्री. वसंतदादा पाटील यांना पाठींबा दिलेला असला तरी कॉंग्रेस (आय) पक्षाने दुस-या आणि तिस-या दर्जाचे अनेक पुढारी आकर्षित केले. महाराष्ट्रात कॉंग्रेस (आय) पक्षाचे एकमेव ध्येय असे होते की यशवंतराव चव्हाणांच्या कॉंग्रेसला बहुमत मिळवून द्यायचे नाही आणि कॉंग्रेस (आय) पक्षाने मोठया प्रमाणावर उमेदवार उभे केले.

जनता पक्षाला स्वतःच्याच प्रश्नास तोंड द्यावे लागत होते. शेतकरी कामगार पक्षाला तिकिट वाटपात मोठा वाटा हवा होता. पण त्यास जास्त जागा मिळाल्या नाहीत. म्हणून शेतकरी कामगार पक्षाने मोठया प्रमाणावर आपले उमेदवार उभे केले. वसंतरावदादांनी चांगले उमेदवार निवडले होते. त्यांच्याकडे संघटना चांगली होती आणि मतदात्यांची मने बदलविण्यासाठी पुष्कळ गोष्टी त्यांच्याकडे होत्या. (उदा. साखर कारखाने, जिल्हा परिषद, नगरपालिका, सहकारी सोसायटया इ.) इंदिरा गांधींना

अशा विरोधी पक्षाच्या विरोधात स्वत:ची लोकप्रियता अजमावून पहावयाची होती. म्हणून आंध्र, महाराष्ट्र, कर्नाटक आणि आसाम येथील निवडणूकांना खास महत्व होते. इंदिरा गांधीना जनता पक्षाबरोबर लढत द्यावयाची होती. इंदिराजींच्या आयुष्यातील महत्वाचे असे हे एक युध्द होते. २८

## १९७८ ची महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक

१९७८ साली झालेली महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक अत्यंत महत्वाची होती. कारण महाराष्ट्रात जनता पक्ष, कॉंग्रेस (आय) व कॉंग्रेस (रेड्डी) या तीन प्रमुख पक्षात तिरंगी लढत होती. केंद्रात जनता पक्षाची सत्ता होती. मित्रपक्षांचा जनता पक्षाला पाठींबा होता, ही जनता पक्षाच्या दृष्टीने जमेची बाजू होती. निवडणूकीच्या निकालाने दाखवून दिले की, इंदिराजी ही एक संपलेली शक्ती नव्हती. इंदिराजींनी यशस्वीपणे दाखवून दिले की कॉंग्रेस पक्ष त्यांच्याशिवाय निवडणूक जिंकू शकत नाही. विदर्भ विभागात कॉंग्रेस (आय) ने उल्लेखनीय यश मिळविले. कॉंग्रेस (रेड्डी) ला ६९ जागा मिळविण्यात समाधान मानावे लागले. या निवडणुकीत कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नाही. विधानसभा निवडणूक निकाल तक्ता पुढीलप्रमाणे -

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक १९७८ - निकाल तक्ता

| अ.नं. | पक्षाचे नाव | जिंकलेल्या जागा | मतदान टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | जनता पक्ष | ९८ | २७.२२ |
| २) | कॉंग्रेस रेड्डी | ६९ | २४.५१ |
| ३) | कॉंग्रेस (आय) | ६२ | १७.८४ |
| ४) | शे.का.प. | १३ | ५.०५ |
| ५) | मा.क.प. | ९ | १.७३ |
| ६) | भा.क.प. (मा.) | १ | १.३७ |
| ७) | इतर | ३६ | २२.२८ |
| | एकूण .. | २८८ | १००.०० |

वरील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रात कोणत्याच राजकीय पक्षाला बहुमत मिळाले नाही. जनता व त्यांचे पुतीपक्ष यांना फक्त १३२ जागा मिळाल्या. त्यांना बहुमतासाठी १३ जागांची आवश्यकता होती. जनता पक्ष, कॉंग्रेस (आय), कॉंग्रेस (रेड्डी) या प्रमुख पक्षांची प्रादेशिक विभागणी झाली. मुंबई आणि कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या तीन वेगवेगळ्या विभागामध्ये वरील तीन प्रमुख पक्ष यशस्वी झाले. विशेष म्हणजे या निवडणूकीमुळे यशवंतराव चव्हाण यांच्या एकाधिकार राजकीय वर्चस्वाला धक्का बसला. [२९]

इ.स. १९७८ ची गडहिंग्लज विधानसभा निवडणूक

महाराष्ट्रात २५ फेब्रुवारी, १९७८ रोजी विधानसभा निवडणुका झाल्या. महाराष्ट्र विधानसभेच्या कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १२ जागांपैकी ६ जागा भारतीय कॉंग्रेसने जिंकल्या. दोन जागा जनता पक्षाने, उरलेल्या ४ जागापैकी ईंदिरा कॉंग्रेस व मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्षाने प्रत्येकी एक व अपक्षांना २ जागा गेल्या. १९५२ पासून गेल्या पाच विधानसभा निवडणुकात शेतकरी कामगार पक्षाचा उमेदवार कोल्हापूर मतदार संघातून यापूर्वी निवडून येत असे. या निवडणुकीत ही जागा जनता पक्षाने मिळविली. जनता पक्षाचे श्री. रविंद्र सबनीस विजयी झाले. तसेच वडगाव मतदार संघातून राखीव जागेसाठी जनता पक्षाचे श्री. नानासो माने विजयी झाले. कोल्हापूर व वडगांव येथील जागा जनता पक्षाने मिळविल्या. शिरोळ मतदार संघातून श्री. रत्नाप्पा कुंभार, सांगरूळ मतदार संघातून श्री. श्रीपतराव बोंद्रे, शाहुवाडी मतदार संघातून श्री. उदयसिंगराव गायकवाड, राधानगरी मतदार संघातून श्री. दिनकरराव जाधव, पन्हाळा-बावडा मतदार संघातून यशवंत एकनाथ पाटील हे भारतीय कॉंग्रेसचे उमेदवार विजयी झाले. इचलकरंजी मतदार संघातून मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे श्री. एस्.पी. पाटील विजयी झाले. गडहिंग्लजमधून डॉ. एस्.एस्. घाळी कॉंग्रेस (आय) चे विजयी झाले. कागलमधून श्री. विक्रमसिंह घाटगे व चंदगडमधून श्री. विठ्ठल पाटील हे दोघे अपक्ष उमेदवार विजयी झाले.

गडहिंग्लज मतदार संघातून कॉंग्रेस आय पक्षामार्फत डॉ. एस्.एस्. घाळी, कॉंग्रेस रेड्डी-चव्हाण पक्षामार्फत श्री. नागाप्पा बटकडली आणि जनता

पक्षामार्फत ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी निवडणूक लढविली होती. गडहिंग्लज मतदार संघात तीनही उमेदवार मातब्बर व जनताभिमुख असल्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. डॉ. एस्.एस्. घाळी यांच्या प्रचारासाठी गडहिंग्लजमधील प्रमुख कार्यकर्ते श्री. बसगोंडा पाटील, श्री. शिवाजीराव देसाई यांनी विशेष प्रयत्न केले. गडहिंग्लज तालुक्याच्या विकासासाठी डॉ. एस्.एस्. घाळी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. डॉ. एस्.एस्. घाळी हे गडहिंग्लज तालुक्यातील लोकप्रिय नेते होते. गडहिंग्लज शहराबरोबरच डॉ. घाळी यांना तालुक्याच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केले होते. डॉ. एस्.एस्. घाळी यांचा लोकसंग्रहही मोठा होता.

अखिल भारतीय काँग्रेस रेड्डी-चव्हाण पक्षामार्फत गडहिंग्लज भागातील सामाजिक कार्यकर्ते श्री. नागाप्पा बटकडली यांनी निवडणूक लढविली. श्री. नागाप्पा बटकडली यांचाही लोकसंग्रह मोठा होता. माजी आमदार आप्पासाहेब नलवडे यांचा श्री. बटकडलींना पाठिंबा होता. जनता पक्षामार्फत गडहिंग्लज भागातील तरुण समाजवादी कार्यकर्ते ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी निवडणूक लढविली. या निवडणूकीत ॲड. श्रीपतराव शिंदे यांचे जनता पक्षाच्या रुपाने नवीन नेतृत्व या तालुक्यात उदयास आले. गडहिंग्लज तालुक्यात जनता पक्ष खेडयापाडयापर्यंत पोचविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. श्री. श्रीपतराव शिंदे यांच्या निवडणूक प्रचारासाठी ज्येष्ठ विचारवंत प्रा. ग्र.प्र. प्रधान, श्री. बा.न. राजहंस यांनी तालुक्यातून प्रचार दौरे केले होते. गडहिंग्लज विधानसभा १९७८ चा तक्ता पुढीलप्रमाणे -

इ.स. १९७८ ची गडहिंग्लज विधानसभा निवडणूक तक्ता

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | डॉ. शिवलिंग शिवयोगी धाळी | कॉंग्रेस आय | २५,४३२ |
| २) | श्री. नागाप्पा गुरुलिंगाप्पा बटकडली | कॉंग्रेस रेड्डी | २४,३८९ |
| ३) | अॅड.श्रीपतराव दिनकरराव शिंदे | जनता पक्ष | २३,३०२ |

वरील निवडणुकीत डॉ. एस्.एस्. धाळी हे १,०४३ मते अधिक मिळवून विजयी झाले. विशेष म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसचे विजयी झालेले डॉ. एस्.एस्. धाळी हे एकमेव उमेदवार होते. या विजयामुळे जिल्ह्याच्या राजकारणात डॉ. एस्.एस्. धाळी यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

## १९७८ च्या विधानसभा निवडणुकीनंतर वसंतदादा पाटील मुख्यमंत्री

१९७८ मध्ये त्यांच्या कॉंग्रेस प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करण्यासाठी विधानसभेच्या निवडणूका इंदिराजींनी लढविल्या. त्यावेळी आंध्रमध्ये डॉ. चन्ना रेड्डी व कर्नाटकमध्ये देवराज अरस यांच्याकडून त्यांना भक्कम पाठिंबा मिळाला. परंतु महाराष्ट्रामध्ये शंकरराव चव्हाण की ज्यांनी महाराष्ट्र पक्ष संघटना करावयास हवी होती त्याऐवजी ते जनतापक्ष पुढारी असलेल्या गटात सामील झाले. काही सर्वात मोठ्या चुकांपैकी शंकरराव चव्हाणांची ती फार मोठी चूक होती. त्यावेळी असे म्हटले जात होते की, वसंतराव नाईकांनी त्यांच्या पाठीराख्यांना इंदिराजींच्या पक्षात जाण्यासाठी प्रोत्साहन दिले होते.

पण स्वत: वसंतराव नाईक रेड्डी काँग्रेसमध्येच राहीले. इंदिरा काँग्रेस पक्षात सामील झाले नाहीत. वसंतदादा पाटील यांना शुगर लॉबी, काँग्रेस संघटना आणि जिल्हा परिषद अध्यक्ष यांचा पाठिंबा असल्यामुळे ते पक्षाची एक शक्ती होते. सुरवातीला असे लक्षात आले की फक्त याच गोष्टीच्या आधारावर निवडणूका जिंकता येत नाहीत. विदर्भामध्ये काँग्रेस (आय)ने काँग्रेस रेड्डीला पराभूत केले. तसेच जनता पक्ष व त्यांचे मित्र पक्ष यांनी मुंबई विभागात काँग्रेस रेड्डीचा दारूण पराभव केला. काही मंत्र्यांना त्यांच्या अनामत रक्कमासुध्दा गमवाव्या लागल्या.

त्यावेळी वसंतदादा पाटील आणि वसंतराव नाईक यांनी जलद गतीने हालचाली केल्या आणि ६२ जागा मिळविलेल्या काँग्रेस (आय) पक्षाबरोबर संयुक्त सरकार स्थापन केले. नाशिकराव तिरपुडे काँग्रेस(आय) हे उपमुख्यमंत्री झाले. [३०]

## पुलोद सरकारची स्थापना

वसंतदादांनी नेतृत्व केलेल्या संयुक्त सरकारला यशवंतराव चव्हाण यांच्याकडून मान्यता मिळाली नव्हती. काँग्रेस (आय) पक्ष आणि काँग्रेस रेड्डी पक्ष यांना जवळपास समसमान जागा मिळाल्या होत्या. स्वत:ला निर्णायक बहुमत नसले तरी वसंतदादांनी मूळ काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्याशी संधान बांधून मंत्रीमंडळ बनविले. पण यशवंतरावांना मानणाऱ्या शरद पवारांनी चार महिन्यातच पलटी घेऊन जनता पक्षाशी समझोता केला. वसंतदादा सत्तेवरून खाली आले आणि जनता पक्षाच्या साहाय्याने पुलोद ही नवी आघाडी स्थापून शरद पवार मुख्यमंत्री झाले. यशवंतराव चव्हाणांनी शरद पवारांच्या धोरणास उघड पाठिंबा दिला नाही,

पण असे म्हटले जाते की यशवंतराव चव्हाणांच्या आज्ञेनुसारच शरद पवारांनी तसे केले होते. शरद पवारांनी केलेल्या या बंडामुळे यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव पाटील यांच्या दीर्घकालीन मैत्रीस तडा गेला.

जुलै, ७८ ते मार्च, ८० या काळात महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे फार तुकडे झाले. शरदरावांचे मंत्रीमंडळ सुमारे पावणे दोन वर्ष टिकले. त्यांना आघाडीचे सरकार चालविणे भाग होते. पण त्यांनी ते यशवंतरावांच्या शैलीने आणि त्यांच्या अप्रत्यक्ष आशिर्वादाने चालविले. शरद पवार मंत्रिमंडळाला वर्ष होते न होते इतक्यात केंद्रीय स्तरावर उलथा-पालथी झाल्या. जनता पक्षाची शकले उडाली आणि हा मोका साधून इंदिरा गांधीनी तेथील मंत्रीमंडळ उलथविण्यात यश मिळविले. मोरारजी देसाई सरकार कोसळले. चरणसिंग यांचे सरकार महिन्याभरातच संसदेत बहुमत सिध्द करु न शकल्यामुळे कोसळले. चरणसिंग यांच्या काळजीवाहू सरकार काळात यशवंतराव चव्हाण यांना उपपंतप्रधान होण्याची संधी मिळाली. जनता पक्षाच्या कडबोल्याच्या राज्यकारभारातील नाकर्तेपणा-मुळे त्याला म्हणजेच त्याच्या शकलांना फारशी राजकीय पत राहिली नव्हती. जनता पक्ष केवळ अडीच वर्ष सत्तेवर राहिला. दुहेरी निष्ठा, अंतर्गत दुही या कारणामुळे जनता राजवट अपयशी ठरली. तेव्हा जानेवारी, १९८० मध्ये संसदेच्या निवडणुका झाल्या. इंदिरा काँग्रेसला भरघोस बहु-मताने केंद्रात राज्यसत्ता मिळाली. इतर सर्व पक्ष संख्याबलाने किंवा राजकीयदृष्टया अप्रभावी, नगण्य बनले. तेव्हा राज्यांतील सरकारे पाडून तेथे आपल्या पंखाखालची नवी सरकारे आणणे ओघानेच आले. त्याप्रमाणे पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू यासारखी काही राज्ये वगळता इतर राज्यात १९८० च्या मध्याला इंदिरा काँग्रेसची सरकारे सत्तेवर आली. महाराष्ट्रात वसंतदादांची पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची संधी हुकली आणि

इंदिराजींचे सच्चे अनुयायी बॅरि.ए.आर. अंतुले हे मुख्यमंत्री बनले. ए.आर. अंतुले यांना आधीच्या मुख्यमंत्र्यासारखा महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात सामाजिक-राजकीय पाया नव्हता. जो पाठिंबा निर्विवाद आहे असे म्हणता येईल. तो म्हणजे इंदिराजींच्या कृपेचा आणि शहरी बडया भांडवलदारांचा. अंतुले सत्तेचा कोट किती सांभाळण्याची शक्यता काळच ठरविणार होता. [३१]

## डॉ. एस्.एस्. घाळी यांची राजकीय भूमिका

गडहिंग्लज शहर आणि तालुक्यातील सार्वजनिक कामाचे हिशोब मांडताना डॉ. एस्.एस्. घाळी यांच्याकार्याचा विचार करावा लागतो. तब्बल २२ वर्षे नगराध्यक्षपदावर आणि ८ वर्षे आमदार म्हणून डॉ. शिवलिंग घाळी यांनी केलेल्या कार्याचा ठसा गडहिंग्लज परिसरावर उमटलेला आहे. १९७८ साली डॉ. एस्.एस्. घाळी यांची विधानसभेवर निवड झाली. सामान्यांशी अतूट नाते निर्माण करणारे डॉ. घाळी हे तालुक्यात अत्यंत लोकप्रिय होते. विशेष म्हणजे १९७८ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी विभागात काँग्रेस (आय) तिकिटावर विजयी झालेले ते एकमेव उमेदवार होते. इ.स. १९७८ ते १९८५ या काळात गडहिंग्लज तालुक्यात आणि कोल्हापूर जिल्हयाच्या राजकारणात डॉ. घाळी यांनी महत्वाची राजकीय भूमिका बजावली आहे. डॉ. घाळी हे इंदिरा काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते होते. इंदिरा गांधीच्या पडत्या काळातही त्यांनी काँग्रेस (आय) पक्षाचा त्याग केला नाही. या एकाच गोष्टीवरुन त्याची प्रखर ध्येयनिष्ठा स्पष्ट होते. २४ फेब्रुवारी, १९६० ते १९ फेब्रुवारी, १९६१ या काळात ते प्रथमत: गडहिंग्लज नगरपरिषदेचे नगराध्यक्ष झाले. त्या नंतरचा अल्पकाळ वजा करता दि. १९ जुलै, १९६२ ते ५ फेब्रुवारी, १९८१ अखेर सलग बावीस वर्षे नगराध्यक्षपद भूषविणारी

ती पहिलीच व्यक्ति म्हणावी लागेल. विशेषत: १९७५ ते १९८१ या काळात जेव्हा महाराष्ट्रात प्रथमत:च नगराध्यक्षपद प्रत्यक्ष मतदाराकडून निवडले जाण्याचा प्रयोग करण्यात आला तेव्हा विरोधी गटाचे उमेदवार अधिक संख्येने निवडून येऊनही नगराध्यक्षपद मात्र डॉ. घाळी यांनाच मिळाले. डॉ. घाळी हे गडहिंग्लज नगरीचे शिल्पकार होते.

१९८० साली महाराष्ट्र विधानसभेची मुदतपूर्व निवडणूक झाली. दुस-या वेळीही ते विजयी झाले. आठ वर्षांच्या आमदारकीच्या काळात त्यांनी तालुक्याचे उत्तम प्रतिनिधित्व केले. राजकीय क्षेत्रात काम करीत असूनही अजात शत्रुत्व सिध्द करणारे डॉ. घाळी हे गडहिंग्लजच्या बहुतेक सर्व विधायक कार्याच्या केंद्रस्थानी असत. सामाजिक आणि राजकीय कार्याबरोबर त्यांनी शिक्षणक्षेत्रातही भरीव कामगिरी केली. विद्या-प्रसारक मंडळाची स्थापना करून माध्यमिक शाळा सुरु केली. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही. टी. पाटील यांच्या सहकार्याने शिवराज महाविद्यालय सुरु केले. हे महाविद्यालय दुस-या संस्थेकडे हस्तांतरित झाल्याने त्यांनी नवी शिक्षण संस्था स्थापन केली. त्यांच्या या संस्थेत बालवाडी-पासून पदवी पर्यंतचे आणि बी. एड्. पर्यंतचे शिक्षण मिळण्याची सोय झालेली आहे. त्यांच्या पश्चात्य संस्थेने महाविद्यालयाला त्यांचे नांव दिले आहे.

गडहिंग्लज शहरातील सुमारे ८० टक्के छोटे-मोठे उद्योग डॉ. घाळी यांच्या हस्ते सुरु झालेले आहेत. वैद्यकीय व्यवसायाने त्यांचे नांव ग्रामीण भागात घरोघरी पोहचले होते.

गडहिंग्लजचे नगराध्यक्ष म्हणून काम करीत असताना त्यांनी गडहिंग्लज शहराचा कायापालट केला. पाणी योजनेची पूर्तता, नगरपालिकेच्या नव्या

वास्तूची व पू. सानेगुरुजी वाचनालय वास्तूची उभारणी, गडहिंग्लज शहर विकास योजनेची सुरवात, वीज मंडळ, एस्.टी. डेपो व स्टॅण्ड, प्रांत कार्यालयांना जागा देऊन ही कार्यालये गडहिंग्लजमध्ये ठेवली. शहर सौंदर्यात भर घालणारे पुतळे बसविले. प्रवेशद्वार उभारले, गडहिंग्लज तालुका ख.वि.सह. संघ लि., श्री. वीरशैव को-ऑप. बँक, शिवाजी विद्यापीठ सिनेटवर, लायन्स क्लब, साधना एज्युकेशन सोसायटी अशा विविध सामाजिक संस्थांच्या जडणघडणीमध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्षपद दोन वर्षे भूषविले. १९७८ ते १९८५ या काळातील डॉ. शिवलिंग घाळी यांचे राजकारण गडहिंग्लज तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी, विधायक कार्यासाठी होते असेच म्हणावे लागेल.[३३]

## १९८० ची विधानसभा निवडणूक

१९८० च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत कॉंग्रेस (आय) ला दोन तृतियांश बहुमतास केवळ ५ जागा कमी पडल्या. या निवडणूकीत कॉंग्रेस (आय) ने प्रचंड यश मिळविले. कॉंग्रेस (आय) ने २८८ पैकी १८६ जागा मिळविल्या. मुंबई कोकण प्रांतात विरोधकांना धुईसपाट करून विदर्भातही आपले प्रभुत्व राखणा-या आय कॉंग्रेसला मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात मात्र अरस कॉंग्रेसच्या विरोधाला प्रखर तोंड द्यावे लागले. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातच फक्त अरस कॉंग्रेसने ४७ जागा जिंकल्या. विसर्जित विधानसभेत अरस कॉंग्रेसचे ४५ सदस्य होते. शेतकरी कामगार पक्षाही इंदिरा लाटेतून काही प्रमाणात निसटला. विसर्जित विधानसभेत शेतकरी कामगार पक्षाचे १३ सदस्य होते. आता ९ जागा जिंकल्या. १९८० च्या निवडणूकीत साफ धुव्वा उडालेला पक्ष म्हणजे जनता पक्ष आणि भारतीय

जनता पक्ष होय. संघटित जनता पक्षाने १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत ९९ जागा जिंकल्या होत्या. पण आता जनता पक्ष व भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षाच्या नवनिर्वाचित आमदारांची संख्या केवळ ३१ होती. जनता पक्ष १७ आणि भाजपला १४ जागा मिळाल्या. याचाच अर्थ गेल्या निवडणुकीत जिंकलेल्या जागांच्या एक-तृतीयांश जागाही यावेळी भारतीय जनता पक्ष व जनता पक्षाला मिळाल्या नाहीत. [३४]

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक - १९८० तक्ता

[३५]

| अ.नं. | पक्षाचे नांव | जिंकलेल्या जागा | मताचे शे.प्रमाण |
|---|---|---|---|
| १) | काँग्रेस (आय) | १८६ | ४४.४८ |
| २) | काँग्रेस (अरस) | ४७ | २०.५४ |
| ३) | जनता | १७ | ८.५६ |
| ४) | भा.ज.प. | १४ | ९.३७ |
| ५) | मा.क.प.(पी.)(एम्) | २ + २= ४ | २.१४ |
| ६) | शे.का.प. | ९ | ४.१३ |
| ७) | इतर | ११ | १०.७८ |
| | एकूण .. | २८८ | १००.०० |

## गडहिंग्लज विधान सभा मतदार संघ निवडणूक - १९८०

१९८० च्या कोल्हापूर जिल्हा विधानसभा मतदार संघातील १२ जागा पैकी ८ जागा काँग्रेस (आय) ने जिंकल्या. २ जागा पैकी ७ जागा काँग्रेस(आय)

ले जिंकल्या. २ जागा अरस कॉंग्रेसने व १ जागा शेतकरी कामगार पक्षाने तर १ जागा अपक्षाने जिंकली. शिरोळच्या अटीतटीच्या चौरंगी लढतीत श्री. रत्नाप्पा कुंभार हे शेतकरी कामगार पक्षाचे दिनकर यादव यांच्याकडून अनपेक्षितरित्या पराभूत झाले. तर सांगरूळमध्ये श्रीपतराव बोंद्रे(अरस) कॉंग्रेस हे सांगरूळ मतदार संघातून विजयी झाले. इचलकरंजीतून श्री.कल्लाप्पाण्णा आवाडे कॉंग्रेस (अरस), वडगांव (राखीव) मतदार संघातून जयवंत आवळे कॉंग्रेस (आय), पन्हाळा-बावडा मतदार संघातून अपक्ष उमेदवार श्री. यशवंत एकनाथ पाटील, राधानगरी मतदार संघातून हरिभाऊ कडव (कॉंग्रेस आय), गडहिंग्लज मतदार संघातून डॉ. एस.एस. घाळी, कॉंग्रेस(आय) चंदगड मधून व्ही.के. चव्हाण-पाटील, शाहुवाडीमधून श्री. बाबासाहेब पाटील, करवीर मधून दिग्विजय खानविलकर हे कॉंग्रेस (आय) असे उमेदवार निवडून आले.

गडहिंग्लज मतदार संघात डॉ. शिवलिंग घाळी, कॉंग्रेस (आय) श्री. बाबासाहेब कुपेकर कॉंग्रेस (अरस), शिंदे श्रीपतराव दिनकरराव, जनता पक्ष यांनी निवडणूक लढविली. गडहिंग्लज मतदार संघातील निवडणूक निकाल तक्ता खालील प्रमाणे -

गडहिंग्लज विधानसभा मतदार संघ निवडणूक १९८० - तक्ता

तालिका -

झालेले मतदार - ७५,६२२, वैध मते - ७३,८५४, अवैध मते - १,७६८.

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | डॉ. घाळी शिवलिंग शिवयोगी | कॉंग्रेस (आय) | ३१,३४५ |
| २) | देसाई कृष्णराव रखमाजीराव उर्फ कुपेकर बाबासाहेब | कॉंग्रेस (अरस) | १७,३४५ |
| ३) | शिंदे श्रीपतराव दिनकरराव | जनता पक्ष | २५,११४ |

वरील निवडणुकीत डॉ. शिवलिंग घाळी कॉंग्रेस (आय) हे ६,२८१ मते अधिक मिळवून विजयी झाले. १९७८ च्या निवडणुकीत डॉ. एस्.एस्. घाळी कॉंग्रेस (आय) हेच या मतदार संघातून निवडून गेले होते. या निवडणूकीत त्यांनी ही जागा कायम राखण्यात यश मिळविले. त्यामुळे जिल्ह्याच्या राजकारण त्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. सलग दोनवेळा निवडून येणारे गडहिंग्लज मतदार संघातील ते पहिले उमेदवार होत.

## जनता पक्षाचा अस्त आणि १९८० च्या लोकसभा निवडणुकांची घोषणा

जनता सरकार हे अंतर्गत बाबीमुळे विस्कळीत झाले होते. चरणसिंग आणि मोरारजी देसाई यांचे सख्य राहिले नाही. शेवटी चरणसिंगानी जनता पक्षाचा त्याग केला. १९७९ च्या पावसाळी अधिवेशनात यशवंतराव चव्हाणांनी जनता पक्षाविरूध्द लोकसभेत अविश्वास ठराव मांडला. त्यानंतर अनेक खासदारांनी जनता पक्षाचा त्याग केला. मोरारजी देसाईंनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. इंदिरा गांधींनी शासनाबाहेरून चरणसिंगाना पाठिंबा दिला.

चरणसिंगानी सरकार निर्मितीची तयारी दाखविली तेव्हा यशवंतराव चव्हाणांनी पाठिंबा दिला. जुलै, १९७९ मध्ये चरणसिंग भारताचे पाचवे पंतप्रधान झाले आणि यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान बनले. मात्र चरणसिंगाना दिलेला पाठिंबा इंदिरा गांधींनी ऐनवेळी काढून घेतला. त्यामुळे २० ऑगस्ट, १९७९ रोजी बहुमत सिध्द न करता आल्यामुळे चरणसिंग मंत्रि-

मंडळाने राजीनामा दिला. लोकसभा बरखास्तीचा निर्णय राष्ट्रपती संजीव रेड्डींनी घेतला. निवडणुका होऊन नवीन सरकार सत्तेवर येईपर्यंत चरणसिंग सरकारने काळजीवाहू सरकार म्हणून काम करावे अशी विनंती करण्यात आली.

१९७९ च्या ऑक्टोबरमध्ये शरद पवार आणि यशवंतराव चव्हाण एकत्र आले. दरम्यान वसंतदादा पाटील व शंकरराव चव्हाण परत काँग्रेस-मध्ये आले. [३६] जानेवारी, १९८० मध्ये लोकसभेच्या निवडणुका घेण्यात आल्या. कोल्हापूर लोकसभा मतदार संघातून १९७७ साली शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार श्री. दाजीबा देसाई यांनी माजी खासदार शंकरराव माने यांचा १६५ मतांनी पराभव केला होता. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत उदयसिंगराव गायकवाड हे काँग्रेस (आय) पक्षाचे उमेदवार विजयी झाले.

**कोल्हापूर लोकसभा मतदार संघ निवडणूक सन १९८० - निकाल तक्ता**

**तालिका**

| | | | |
|---|---|---|---|
| **एकूण मतदार** - | **६,५१,५९९** | **एकूण झालेले मतदार** - | **४,०३,३२६** |
| **वैध मते** - | **३,९३,३२२** | **अवैध मते** - | **१०,००४** |

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्ष | एकूण मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | श्री. गायकवाड उदयसिंगराव नानासाहेब | काँग्रेस(आय) | २,४५,७५७ |
| २) | श्री. निंबाळकर राजाराम दादासाहेब | अपक्ष | ४६,५२६ |
| ३) | श्री. देसाई दाजिबा बळवंत | शे.का.प. | ९१,३१४ |
| ४) | श्री. भोसले वसंत रावजी | रिपब्लिकन (गवईगट) | १,९४५ |
| ५) | श्री. जगताप नामदेव ज्ञानोबा | अपक्ष | १,८६२ |
| ६) | श्री. पवार तुकाराम दत्ताजी | अपक्ष | १,९५२ |
| ७) | श्री. भिवटे बंडू आप्पाण्णा | अपक्ष | १,३१३ |
| ८) | श्री. माळी शामराव गोविंद | राष्ट्रीय लोकमंच | १,६०१ |
| ९) | श्री. देसाई शंकरराव कृष्णाजीराव | रॅडिकल फ्रंट | १,०५२ |

या निवडणुकीमध्ये श्री. उदयसिंगराव गायकवाड काँग्रेस (आय) हे १,५४,४४३ मतानी विजयी झाले. त्यांना गडहिंग्लज मतदार संघामधून ४०,६०१ मते मिळाली होती. श्री. उदयसिंगराव गायकवाड हे फेब्रुवारी, १९७८ मध्ये घेतलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत शाहुवाडी मतदार संघातून विजयी झाले होते.

१९८० च्या संसदीय निवडणुकीत इंदिरा गांधीच्या काँग्रेस (आय) पक्षाला भरघोस यश मिळाले. लोकसभेत ३५३ जागा मिळाल्या. त्यामुळे काँग्रेस पक्षाला सोडून गेलेली मंडळी पुन्हा काँग्रेस (आय) मध्ये डेरेदाखल झाली.

गडहिंग्लज नगरपालिका, पंचायत समिती आणि साखर कारखाना यांचे राजकारणातील असलेले संबंध तालुका राजकारणातील राजकीय संस्था -

स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती प्रामुख्याने सत्तेचे विकेंद्रीकरण व स्थानिक लोकांचा स्थानिक पातळीवर सक्रिय सहभाग या उद्देशानेच करण्यात आली. सत्तेचा वापरातील वाटा स्थानिक जनतेला का द्यावा ? तर त्यांना त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणता यावा म्हणून पंचायत राज्याचा उद्देश या अर्थाने कितपत साध्य झाला हा महत्वाचा प्रश्न आहे व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर किती प्रभाव पडला. पंचायत राज्य आणि सहकारी क्षेत्र यांचा घनिष्ठ संबंध आहे. दोन्हीतही लोकांना प्राधान्य आहे. सहकारी संस्था किंवा सहकारी चळवळ ही प्रामुख्याने आर्थिक अंगावर भर देणारी आहे. अर्थात आर्थिकतेवर सामाजिक व राजकीयता अवलंबून असते. नगरपालिका पंचायत समिती व साखर कारखाना ही तालुका पातळीवरील सर्व अंगे परस्परावलंबी आहेत. सर्वसामान्य माणसाला राजकीय दृष्टीने शिक्षित करण्यात पंचायत राज्य पध्दतीने बरीच प्रगती केली आहे. ग्रामपंचायतीची निवडणूक, पंचायत समितीची निवडणूक, नगरपालिकेची निवडणूक, जिल्हा परिषदेची निवडणूक, मार्केटिंग कमिटीची निवडणूक, सहकारी संस्थाच्या निवडणुका यामुळे सर्वसामान्य माणसाचा सहभाग वाढला आहे. त्याप्रमाणे ग्रामीण नेतृत्व झपाट्याने उदयास येऊ लागले आहे.

स्थानिक राजकारणातून जे नवे नेतृत्व निर्माण झाले आहे ते सत्ता राजकारणाच्या प्रयत्नात असते. सत्तास्थाने मिळविणे, आपला राजकारणातील प्रभाव वाढविणे, ग्रामपातळीवरून पंचायत पातळी गाठणे, त्यानंतर

जिल्हा पातळीवरील नेतृत्व उभे करणे व हळूहळू राज्यपातळी व राष्ट्र पातळीचा विचार करणे अशी प्रक्रिया वाढीस लागलेली दिसते. हळूहळू अप्रत्यक्षपणे पक्षीय राजकारणाचा प्रभाव या पातळ्यांवर वाढत आहे. खेडे पातळीवर सरपंच, पंचायत सदस्य, पोलीस पाटील, जमिनदार हे तेथील श्रेष्ठीजन ठरतात. सत्तेचा सोपान चढतांना अनेक टेकू घ्यावे लागतात. वेगवेगळ्या प्रभावाआधारे ते तालुका पातळीवर पोहचण्याचा प्रयत्न करतात.

स्थानिक स्वराज्य संस्था व सहकारी संस्था यांना तालुकापातळीवरील राजकारणात फार महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी संस्थांपैकी सहकारी साखर कारखान्यांनी आपला फार मोठा प्रभाव निर्माण केलेला दिसतो. वसंतदादा पाटील, रत्नाप्पा कुंभार, शरद पवार आदि नेत्यांना महाराष्ट्राच्या राजकारणात जो जम बसविता आला त्याचे प्रमुख कारण म्हणजे सहकारी संस्थेतील प्रभावाचा त्यांनी चाणाक्षपणे करुन घेतलेला वापर हे आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर पंचायती संस्था व सहकारी संस्था आजही वर्चस्व गाजवितात, हे शासनात सत्तास्थानी येणारी मंडळी पाहिले म्हणजे सहज लक्षात येते. कायदेमंडळात साखर कारखान्याचा चेअरमन, बराच काळ जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविलेली व्यक्ती, नगराध्यक्ष अशा व्यक्ती आमदार म्हणून निवडून येतात. शेतीप्रधान, जाती प्रधान नेतृत्वाला चालना मिळते. विकास योजना मांडणे, क्रियान्वित करणे, नेतृत्वासमोर समस्या मांडणे त्याची दाद लावून घेणे यादृष्टीने पंचायत समिती, नगरपालिका व साखर कारखान्याची कामगिरी मोलाची आहे. सहकार्य वाढीस लावणे, लोकशाही रूजविणे, विकासाला गती देणे, नेतृत्व पुरविणे, राजकीय सहभाग वाढीस लावणे या दृष्टीने या संस्थांनी बरेच कार्य केले आहे. [३७]

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात पंचायत समिती, नगर-पालिका व साखर कारखाना इ. संस्थांना महत्वाचे स्थान दिसते. १९६२ नंतर सुरु झालेल्या पंचायत राज्याच्या प्रयोगातून स्थानिक पातळीवर जी विविध सत्तास्थाने निर्माण झाली ती स्थानिक राजकारणात महत्वाची ठरली. ग्रामपंचायतीमधून त्या-त्या गावातील राजकीय नेतृत्व आकार घेऊ लागले. नवनव्या व्यक्ती राजकारणात सहभागी होऊ लागल्या. ग्रामपंचायती व पंचायती समिती यांच्याद्वारे आपली राजकीय पाळेमुळे बळकट करणे, निरनिराळ्या राजकीय पुढा-यांना शक्य होते.

## स्थानिक राजकारण आणि नगरपालिका

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात नगरपालिकेचे राजकारणही गाजत आहे. गडहिंग्लज नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधी सत्तारुढ व विरोधी आघाडीतील संघर्षापेक्षा सत्तारुढ शाहू आघाडी अंतर्गत परस्परांना शहाला काटशह देण्याचे राजकारण चालले आहे. गडहिंग्लज नगरपालिकेत सत्तारुढ गट आणि विरोधी गट यांचे आलटून पालटून होणारे सत्तांतर ही तालु-क्याच्या राजकारणालाच कलाटणी देणारे आहे. २२ वर्षे नगराध्यक्ष पद भूषविणा-या डॉ. एस्.एस्. घाळी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली नगरपालिका श्री. श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षाने जिंकून तालुका काँग्रेसला पहिला धक्का दिला. जनता आघाडीचे नेते आमदार श्रीपतराव शिंदे यांनी दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा सुरु ठेवली. गडहिंग्लज नगरपालिकेत जनता आघाडी ही श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वा-खाली सर्वेसर्वा होती. परंतु जनता आघाडीतही तीव्र मतभेद निर्माण झाले. माजी नगराध्यक्ष बादा पेडणेकर यांना अविश्वास ठराव आणून काढण्यात

आले, तर प्रा. विठ्ठल बन्ने (माजी नगराध्यक्ष) यांचेही जनता आघाडीशी मतभेद होऊन शेवटी त्यांनी काँग्रेस (आय) ची छावणी गाठली. श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता आघाडीची सत्ता संपुष्टात आणण्यासाठी काँग्रेस (आय) कार्यकर्त्यांनी चंग बांधला. कारण यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडीने नगरपालिकेतील काँग्रेसची सत्ता संपुष्टात आणली. त्यापाठोपाठ विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करुन जनता दलाचे श्रीपतराव शिंदे विजयी झाले. १९८५ आणि १९९० अशा दोन्ही वेळा त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा पराभव केला. या धक्क्यापाठोपाठच साखर कारखाना राजकारणातही श्रीपतराव शिंदे यांनी बाजी मारली. कारखान्याची सत्तासूत्रे हाती घेतली.

सन १९९२ मध्ये झालेल्या नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस(आय) चे राजकुमार हत्तरकी गट वगळता सर्व काँग्रेस (आय) गट एकत्र आले. राजर्षि शाहू नगरविकास आघाडी स्थापन केली आणि नगरपालिकेत सत्तांतर घडविले. यामुळे तालुका राजकारणाला नवी दिशा मिळाली.

## स्थानिक राजकारण आणि सहकारी साखर कारखाना

गडहिंग्लज सहकारी साखर कारखाना बरीच वर्षे म्हणजे जवळजवळ १२ वर्षे कारखान्याचे संस्थापक चेअरमन माजी आमदार श्री. आप्पासाहेब नलवडे यांच्या हाती होता. गडहिंग्लज साखर कारखाना उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावून कारखाना मार्गी लावणारे आप्पासाहेब नलवडे यांच्या विरोधात काँग्रेसमधील कुपेकर-हत्तरकी गट आणि जनता दलाचे श्रीपतराव शिंदे यांनी १९८८ साली एकत्र येवून शेतकरी आघाडी स्थापन

केली. त्यावेळी गटबाजीला उधाण येऊन आघाडी दुभंगली. डॉ. शहा-पुरकर यांचे त्याच कालावधीत निधन झाले आणि श्रीपतराव शिंदे यांनी या भांडणाचा फायदा घेऊन आपल्या ताब्यात चेअरमनपद राखले. यानंतरच्या साखर कारखाना राजकारणात काँग्रेस (आय) आणि जनता दल अशी जोरदार रस्सीखेच सुरु झाली. कारखान्याची सार्वत्रिक निवडणूक नोव्हेंबर, १९९३ मध्ये झाली. यामध्ये माजी आम. श्रीपतराव शिंदे यांच्या पॅनेलचा पराभव करुन नलवडे-कुपेकर युतीने सत्ता मिळविली. साखर कारखान्यात निर्विवाद बहुमत मिळविल्यानंतर ४ डिसेंबर, १९९३ रोजी चेअरमनपदी कारखान्याचे संस्थापक आप्पासाहेब नलवडे यांची पुनःश्च निवड करण्यात आली. तर व्हाईस चेअरमनपदी विलासराव बागी यांची निवड झाली. त्यानंतर काही महिन्यातच मार्च, १९९४ मध्ये संचालक मंडळाच्या बैठकीत तज्ज्ञ संचालक कोण ? हा वादाचा मुद्दा होऊन सत्तारुढ गटात नलवडे-कुपेकर अशी फूट पडली. त्यानंतर सत्तारुढ गटात सत्तेची स्पर्धा सुरु झाली. सत्तारुढ मंडळीच्या वादातून कारखान्याचा कारभार हा जिल्ह्यात चेष्टेचा विषय झाला होता. सत्तारुढ मंडळीतील वादाचा ऐकमेव विरोधक व माजी आम. श्रीपतराव शिंदे यांनी फायदा घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केल्याची चर्चा त्यावेळी होती. सत्तारुढ गटातील वादाला कंटाळून चेअरमन आप्पासाहेब नलवडे यांनी प्रकृती अस्वास्थाचे कारण दाखवून सहकाऱ्याना विश्वासात न घेता "थेट" साखर उपसंचालकाकडे दि. ७ जुलै, १९९५ रोजी राजीनामा पाठविला. सत्तारुढ मंडळींनी शहाणपण दाखवून एकत्र येऊन डॉ. प्रकाश शहापूरकर यांची दि. २४ ऑगस्ट, १९९५ रोजीच्या सभेत बिनविरोध निवड केली. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात गडहिंग्लज साखर कारखान्याचा प्रभाव दिसतो. साखर कारखान्याची सत्तासूत्रे हाती बाळगून तालुका राजकारणावर प्रभाव पाडण्याचा प्रत्येक गट प्रयत्न करतांना आढळतो.

## गडहिंग्लज तालुक्यातील कॉंग्रेस पक्षांतर्गत गटांचे राजकारण

गडहिंग्लज तालुक्याच्या गेल्या तीस वर्षांतील राजकीय उलथा-पालथी विचारात घेतल्यास कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारणातील रत्नाप्पा कुंभार विरुद्ध म.दुं. श्रेष्ठी आण्णा तथा खासदार या समिकरणात गडहिंग्लज तालुका ही अपवाद ठरणार कसा ? असे चित्र होते. गाव पातळीवरील ग्रामपंचायती, सोसायटी, दूध संस्था, पंचायत समिती, तालुका संघ, मार्केट कमिटी, जिल्हा बँक, कृषी व ग्रामीण विकास बँक अशा मातब्बर संस्थावर रत्नाप्पाण्णा कुंभार गटाचे वर्चस्व होते. परंतु डॉ. एस्.एस्. घाळी हे खासदार उदयसिंगराव गायकवाड यांचे समर्थक ठरल्याने रत्नाप्पा गटाला शह बसला होता. यातूनच नागाप्पा-ण्णा बटकडली हे अपयशी राजकारणी ठरले. आणि तालुका राज-कारणात म.दुं. श्रेष्ठी गटाचे अस्तित्व संपुष्टात आले.

बदलत्या राजकीय घडामोडीत कॉंग्रेस अंतर्गत दुहीचा लाभ घेऊन जनता दलाला मिळालेल्या संधीचा श्रीपतराव शिंदे यांनी फायदा उठविला. एकदाच नव्हे तर दोन वेळा आमदार होण्याची संधी श्रीपतराव शिंदे यांना मिळाली. श्रीपतराव शिंदे यांनी गडहिंग्लज साखर कारखाना चेअरमन पद मिळविण्यात यश मिळविले. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत पूर्वा-श्रमीचे समाजवादी कॉंग्रेसचे नेते बाबासाहेब कुपेकर यांनी पुलोद आघाडीमार्फत श्रीपतराव शिंदे यांना विजयी करण्यात साथ दिली. त्याचप्रमाणे १९९० च्या विधानसभा निवडणुकीतही कॉंग्रेस (आय) चे श्री. राजकुमार हत्तरकी यांनी श्रीपतराव शिंदेना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले. आणि कॉंग्रेस (आय) उमेदवार बाबासाहेब कुपेकर हे १९९० च्या निवडणुकीत कॉंग्रेस अंतर्गत संघर्षामुळे पराभूत झाले. श्रीपतराव शिंदे यांनी कॉंग्रेस

अंतर्गत दुफळीचा वेळोवेळी लाभ उठविल्याचे आढळते. गडहिंग्लज तालुक्यातील कॉंग्रेस अंतर्गत राजकारणाचा विचार केला तर स्वातंत्र्योत्तर काळात सुरवातीला रत्नाप्पा कुंभार विरुद्ध म.दु. श्रेष्ठी गट आढळतो. नंतरच्या काळात डॉ. एस.एस. घाळी विरुद्ध नागाप्पाण्णा बटकडली गट आढळतो. सध्या कॉंग्रेस अंतर्गत गडहिंग्लज तालुक्यात बाबासाहेब कुपेकर विरुद्ध राजकुमार हत्तरकी गट दिसतो. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाच्या इतिहासात कॉंग्रेस पक्षाची ताकद ही कायम दोन गटात विभागलेली आहे. या दोन गटात नेहमी सत्तेसाठी व खुर्चीसाठी चुरस असते. या चुरशीतून पुढे ऐकमेकांचे पाय ओढण्याचे व पाडापाडीचे राजकारण सुरु झाले. जिल्हा पातळीवरच्या नेत्यांनीही हे सर्व एकत्र आले तर आपल्याला अडचणीत आणू शकतील हे ओळखून त्यांना नेहमी झुंजवत ठेवले. दोन्ही गटाकडून केवळ सत्तेचे व खुर्चीचे राजकारण केले जात आहे. केवळ तालुक्यातील नेत्यांच्या अंतर्गत भांडणामुळे जिल्हा पातळीवरील कोणतेही महत्वाचे पद गडहिंग्लज तालुक्याला मिळालेले नाही. त्यामुळेच इतर तालुक्याच्या मानाने गडहिंग्लज तालुका मागास राहिला आहे. डॉ. एस.एस. घाळी यांच्यानंतर गडहिंग्लज कॉंग्रेस (आय) पक्ष गटबाजीने पोखरलेला आहे. डॉ. घाळी यांनी सर्व गटांना सांभाळून तालुक्याचे नेतृत्व समर्थपणे केले होते.

**<u>श्रीपतराव शिंदे यांची राजकीय भूमिका</u>**

गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणावर प्रख्यात समाजसेवक डॉ. एस. एस. घाळी यांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत सर्व प्रस्थापित कॉंग्रेस पुढाऱ्यांचा विरोध असतानाही

गडहिंग्लज विधानसभेची जागा डॉ. घाळी यांनी कॉंग्रेस (आय) उमेदवार म्हणून जिंकली. त्यांच्या मृत्यूनंतर गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात अनेक नव्या नेत्यांचा उदय झाला. त्यामध्ये जनता पक्षाचे झुंझार नेते, श्रीपतराव शिंदे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. तसेच गडहिंग्लज साखर कारखान्याचे माजी चेअरमन आप्पासाहेब नलवडे, पूर्वाश्रमिच्या समाजवादी कॉंग्रेसचे पुढारी बाबासाहेब कुपेकर आणि डॉ. शहापूरकर, श्री. राजकुमार हत्तरगी, प्रा. किसन कुराडे, प्रा. विठ्ठल बन्ने, विलासराव बागी इत्यादी नेत्यांचा उदय झाला. श्रीपतराव शिंदे वगळता बाकी सर्व पुढारी आज कॉंग्रेस पक्षांतर्गत वेगवेगळ्या गटांचे नेतृत्व करीत आहेत.

ॲड. श्रीपतराव शिंदे हे लहानपणापासून राष्ट्र सेवा दलात काम करीत आले आहेत. त्यामुळे सामाजिक बाबतीत पुरोगामी संस्कार बालपणापासून झाले. राष्ट्रसेवादल, एस्.एम्. जोशी, डॉ. राम मनोहर लोहिया, लोकनायक जयप्रकाश नारायण प्रभृतींपासून प्रेरणा घेऊन श्रीपतराव शिंदे यांनी १९५४ पासून समाजवादी पक्षात क्रियाशील होऊन कार्याला सुरुवात केली. त्यांनी विद्यार्थी दशेतच विद्यार्थी संघटनेची स्थापना करून एस्.एस्.सी. व्याख्यानमालांचे आयोजन इ. विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम सुरु केले. तसेच कोल्हापूरातील विद्यार्थी चळवळीत अग्रभागी राहून श्रीपतराव शिंदे यांनी आपल्या भावी जीवनातील सामाजिक व राजकीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन, कच्छ मुक्ती आंदोलन इत्यादी राष्ट्रीय पातळीवरील आंदोलनात ते सहभागी झाले. त्यांना अटक झाली होती. आणिबाणीत पंधरा महिने कारावासाची शिक्षा झाली होती. समाजवादी पक्षाचे जिल्हा चिटणीस जनता

पक्षाचे उपाध्यक्षा म्हणूनही काम केले. समाजवादी पक्षाचे वतीने अनेक आंदोलनात भाग घेतला आहे. गडहिंग्लज नगरपालिकेतील सत्ताधारी जनता आघाडीचे नेता म्हणून काम केले आहे. नगरपालिका शिक्षाणमंडळाचे चेअरमन म्हणूनही उल्लेखनीय कार्य केले आहे.

धरणग्रस्त, बेकार युवक, कुंभार, बेघर, माकडवाले, बेरड, देवदासी, दलित इत्यादींची वेळोवेळी आंदोलने, धरणे, मोर्चे व अटक या माध्यमातून कार्य केले आहे. गडहिंग्लज, किंबहुना कोल्हापूर संस्थानामध्ये कै. दिनकरराव शिंदे यांचे समाजपरिवर्तन आणि शिक्षाण प्रसाराचे विविध प्रयोग सुरु होते. याचाही प्रभाव त्यांच्यावर बालपणापासुन असल्यामुळे या शैक्षाणिक चळवळीत काही योगदान द्यावे म्हणून हलकर्णी येथे माध्यमिक शाळेत दोन वर्षे शिक्षाक, तर देवबाग (ता. मालवण) येथील शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम केले. सध्या ते महाराष्ट्र राज्य देवदासी निराधार मुक्ती केंद्राचे उपाध्यक्षा, छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट,कोल्हापूर या संस्थेचे संचालक, शिवराज कॉलेज, गडहिंग्लज या संस्थेचे उपाध्यक्षा, काळभैरव शिक्षाण संस्था, गडहिंग्लजचे अध्यक्षा व साधना शिक्षाण संस्थेचे उपाध्यक्षा म्हणून काम पहातात. त्यांचा प्रबोधनात्मक अनेक शिबीरात, परिषदात नेहमी सहभाग असतो. १९७५ साली ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षातेखाली गडहिंग्लज येथे देशामध्ये प्रथमच देवदासी परिषद संघटित केली. कामगार चळवळीशी त्यांचा जवळचा संबंध आहे. एस्.टी. कामगार संपात वेळोवेळी त्यांनी नेतृत्व केले असून त्यासाठी तुरुंगवासही भोगला आहे. मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नासाठीच्या लढयातही सहभाग घेतला. ७ फेब्रुवारी, १९८१ रोजी डाव्या आघाडीमार्फत शेतकरी शेतमजूर जनजागृती दिंडीत त्यांचा सहभाग होता.

देवदासी चळवळ, विषमता निर्मूलन, अंधश्रध्दा निर्मूलन व इतर समाजवादी गटाच्या कार्याशी ते संबंधित आहेत. समाजातील गोरगरीब, दलित, मागास असंघटित - अल्पसंख्यांक, देवदासी, डोंबारी, माकडवाले, गोसावी, कुंभार अशा उपेक्षित घटकांच्या न्याय मागण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांनी विविध आंदोलने उभारली व सर्वच चळवळींना समर्थ नेतृत्व दिले. या विविध संघर्षमय आंदोलनात त्यांना एस्.एम्. जोशी, ना.ग. गोरे, चंद्रशेखर, पन्नालाल सुराणा, मधु दंडवते, प्रा. ग.प्र. प्रधान, मृणालताई गोरे, प्रमिला दंडवते, जॉर्ज फर्नांडीस, भाऊ फाटक, आदी ज्येष्ठ समाजवादी मान्यवरांचा सहवास लाभला. त्यामुळे त्यांच्या समाजकारण आणि राजकारण यांच्या दिशाही पक्क्या झाल्या. अशा विचारसरणी-मधून समाजकारणासाठी राजकारण हेच ध्येय बनले. हे गडहिंग्लज विभागा-पुरते मर्यादित नव्हे तर जिल्ह्यातील दुर्बल घटकांच्या प्रत्येक आंदोलनात ते सहभागी झाले. श्रीपतराव शिंदे यांचे जीवन म्हणजे संघर्षच आहे असे दिसते. श्रीपतराव शिंदे हे तळागाळातून आलेले समाजाभिमुख कार्यकर्ते, नेते आहेत.[३८]

## लोकसभा निवडणूक - सन १९८४

माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची ३१ ऑक्टोबर,१९८४ रोजी हत्या झाली. इंदिरा गांधीच्या हत्येमुळे राजकारणाचे स्वरुपच बदलले. राजीव गांधी पंतप्रधान झाले. लगेच लोकसभा निवडणुकीची घोषणा करुन सर्वच राजकीय पक्षांना धक्का दिला. इंदिरा गांधीच्या हत्येमुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीचा फायदा सत्ताधारी पक्षाला मिळाला. काँग्रेस (आय) पक्षाला "न भूतो न भविष्यती" असे विक्रमी यश मिळाले. काँग्रेस लोकसभेत ४०३ जागा मिळाल्या. महाराष्ट्रात ४८ जागा-

पैकी ४३ जागा काँग्रेस (आय) ने या निवडणुकीत जिंकल्या. सन १९८४ च्या लोकसभा निवडणुकीचा कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचा निकाल खालीलप्रमाणे -

**कोल्हापूर लोकसभा मतदार संघ निवडणूक - सन १९८४ निकाल तक्ता**

**तालिका**

एकूण मतदान - ४,३३,९८८, वैध मते - ४,२४,९२३

अवैध मते - ९,०६५

| अ.नं. | उमेदवाराचे नाव | पक्षाचे नाव | एकूण मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | श्री.उदयसिंगराव नानासाहेब गायकवाड | काँग्रेस(आय) | २,७७,६०३ |
| २) | श्री. बी.डी. किल्लेदार | शेकाप | १,२८,१२९ |
| ३) | श्री. विजयकुमार ज्ञानदेव | अपक्ष | १०,५२६ |
| ४) | श्री. एम्.डी. नलवडे | अपक्ष | ३,८७५ |
| ५) | श्री. श्रीपतराव गोपाळराव सुदर्शनी | अपक्ष | २,२१९ |
| ६) | श्री. भीमराव गोविंद माळी | अपक्ष | १,४२३ |
| ७) | श्री. ॲड. गणेश राम वास्कर | अपक्ष | १,१०८ |

**विधानसभा निवडणूक - १९८५**

लोकसभा निवडणुकापाठोपाठ मार्च, १९८५ मध्ये विधानसभा निवडणुका झाल्या. काँग्रेस (आय) च्या निवडणूक समितीत तिकिट वाटपावरून संघर्ष

झाला. विद्यमान विधानसभेतील २३४ पैकी १३९ प्रतिनिधींना काळ्यात आले. यात अंदाजे १०० उमेदवार वसंतदादा समर्थक होते. लोकसभा निवडणुकीतील चूक यावेळी विरोधी पक्षांनी सुधारली. पुरोगामी लोकशाहीदलाचे पुनरूज्जीवन केले. त्याचप्रमाणे शरद पवारांना एकमुखी नेतृत्व व पाठिंबा दिला. महाराष्ट्राची अस्मिता इंदिरा काँग्रेस सरकार जपत नाही. हा आरोप करून पुलोदने महाराष्ट्राची अस्मिता जपणारे स्थिर व कार्यक्षम सरकार आम्ही देऊ अशी घोषणा केली.

विधान सभेच्या एकूण २८८ जागांसाठी २,२३१ उमेदवार उभे होते. २ व ५ मार्च, १९८५ ला मतदान झाले. पुलोदला सरकार स्थापन करता येऊ शकेल असे विरोधकांना वाटत होते. परंतु ते शक्य झाले नाही. इंदिरा काँग्रेसला १६१ तर पुलोदला १०३ जागा मिळाल्या. [४०]

## विधानसभा निवडणूक - १९८५ - कोल्हापूर जिल्हा

१९८५ च्या विधानसभा निवडणूकीत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये काँग्रेस (आय) पक्षाला प्रबळ विरोधक म्हणून पुलोद आघाडीचे उमेदवार उभे होते. कोल्हापूर जिल्ह्यात एकूण १२ विधानसभा मतदार संघ आहेत. काँग्रेस(आय) पक्ष आणि पुलोद उमेदवार यांच्यात चुरशीची लढत झाली. एकूण १२ जागापैकी ६ ठिकाणी काँग्रेस (आय) चे उमेदवार विजयी झाले, तर ५ ठिकाणी पुलोद आघाडी उमेदवार विजयी झाले व एक जागा बंडखोर इंदिरा काँग्रेस उमेदवाराला मिळाली. पुलोदमधील विजयी झालेल्या उमेदवारामध्ये २ शेतकरी कामगार पक्ष, २ समाजवादी काँग्रेस आणि १ जनता उमेदवाराचा समावेश होता. कोल्हापूर जिल्ह्यातील काँग्रेस (आय)

ला मिळालेल्या ६ जागापैकी तीन जागा पूर्व भागातून मिळाल्या आणि २ जागा पश्चिम भागातून मिळाल्या होत्या. त्यामुळे पूर्व भागातील इंदिरा कॉंग्रेस नेते रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे पुन्हा एकदा जिल्हा वर्चस्व सिध्द झाले. बव्हंशी रत्नाप्पाण्णा कुंभार यांना मानणारे उमेदवार विजयी झाले. कोल्हापूर जिल्हयातील वेगवेगळया मतदार संघात या निवडणुकीसाठी उभे राहिलेले उमेदवार व त्यांचा राजकीय पक्ष यांचे विश्लेषण पुढील प्रमाणे देता येईल.

## विधानसभा - १९८५ - कोल्हापूर जिल्हा

| अ.नं. | मतदार संघ | कॉंग्रेस आय पक्ष | पुलोद आघाडी पुरस्कृत |
|---|---|---|---|
| १) | कोल्हापूर | श्री. लालासाहेब यादव | प्रा.एन्.बी.पाटील (शेकाप) |
| २) | गडहिंग्लज | डॉ. एस्.एस्. घाळी | अॅड श्रीपतराव शिंदे (जनता पक्ष) |
| ३) | शाहुवाडी | श्री. बाबासाहेब पाटील | संजयसिंग गायकवाड (कॉंग्रेस आय) बंडखोर |
| ४) | शिरोळ | श्रीमती सरोजिनी खंजिरे | दिनकरराव यादव (शेकाप) |
| ५) | करवीर | श्री. दिग्विजय खानविलकर | एच्.डी.पाटील (समाजवादी कॉंग्रेस) |
| ६) | वडगांव | श्री. जयवंतराव आवळे | नानासाहेब माने (समाजवादी कॉंग्रेस) |
| ७) | आजरा-चंदगड | श्री. व्ही.के.चव्हाण-पाटील | नरसिंग गुरुनाथ पाटील (अपक्ष) |
| ८) | कागल | श्री. विक्रमसिंह घाटगे | सदाशिवराव मंडलिक (समाजवादी कॉंग्रेस) |
| ९) | इचलकरंजी | श्री. प्रकाश आवाडे | के.एल्. मलाबादे (मा.क.प.) |
| १०) | राधानगरी | श्रीमती तारामती कडव | बजरंग देसाई (समाजवादी कॉंग्रेस) |
| ११) | सांगरुळ | श्रीपतराव बोंद्रे | गोविंदराव कलिकते (शेकाप) |
| १२) | पन्हाळा | यशवंत एकनाथ पाटील | श्री.दत्ता पाटील (समाजवादी कॉंगेस) |

कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर, गडहिंग्लज, कागल, राधानगरी, सांगरूळ या मतदार संघात पुलोद आघाडी पुरस्कृत उमेदवार विजयी झाले; शाहूवाडी मतदार संघात इंदिरा कॉंग्रेस बंडखोर उमेदवार विजयी झाले, तर इतर जागी कॉंग्रेस (आय) चे उमेदवार विजयी झाले. [४१]

गडहिंग्लज तालुक्यात आतापर्यंत कॉंग्रेस पक्षांतर्गत गटबाजीने अनेक वेळा डोके वर काढले होते. कॉंग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे गडहिंग्लज हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला असूनही वारंवार विरोधी पक्षाच्या उमेदवारांना अधून मधून आमदार होण्याची संधी मिळत आली आहे. केंद्रातील कॉंग्रेस पक्षात राष्ट्रीय पातळीवर फूट पडल्यानंतर त्या फूटीचा परिणाम गडहिंग्लज तालुका राजकारणावर ही झालेला दिसतो. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेस उमेदवार डॉ. एस्.एस्. घाळी यांच्या विरोधी रेड्डी कॉंग्रेसमार्फत श्री. नागाप्पाण्णा बटकडली यांनी निवडणूक लढविली होती. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत कॉंग्रेस (आय) चे डॉ. एस्.एस्. घाळी यांच्या विरोधात अर्स कॉंग्रेसचे बाबासाहेब कुपेकर यांनी निवडणूक लढविली होती. जनता पक्षाच्या उदयानंतर श्रीपतराव शिंदे यांचे नेतृत्वही जोमाने उदयास आले. कॉंग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे कॉंग्रेस पक्षाचा प्रभाव कमी झाला होता. तरीसुध्दा १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणूकीत कॉंग्रेस (आय) चे उमेदवार डॉ. एस्.एस्. घाळी यांनी सलग दोन वेळा विजय मिळविला होता. १९७८ व १९८० च्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे हे पराभूत झाले होते. १९८५ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत डॉ. एस्.एस्. घाळींना कॉंग्रेस (आय) चे उमेदवार म्हणून सलग तिसऱ्या वेळीही तिकिट मिळाले. विशेष म्हणजे जनता पक्षामार्फत ॲड. श्रीपतराव शिंदे तिसऱ्यांदा डॉ. घाळी

यांच्या विरोधी लढत देत होते. ही लढत अत्यंत चुरशीची झाली. कॉंग्रेस (आय) चे उमेदवार डॉ. एस्.एस्. घाळी यांचा पराभव करावयाचा म्हणून पुलोद आघाडी मार्फत अरस कॉंग्रेसचे श्री. बाबासाहेब कुपेकर गटांनी श्रीपतराव शिंदेना पाठिंबा दिला होता.

गडहिंग्लज मतदार संघातील निवडणूक वर उल्लेखिलेल्या गट राजकारणाच्या पार्श्वभूमी पार पडली. या निवडणूकीचा निकाल पुढील-प्रमाणे लागला.

गडहिंग्लज विधानसभा मतदार संघ निवडणूक - १९८५

तक्ता

एकूण मतदान - ९०,९७१ वैध मते - ८९,२५७,

अवैध मते - १,५१४

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्ष | एकूण मिळालेली मते |
|---|---|---|---|
| १) | ॲड. श्रीपतराव दिनकरराव शिंदे | जनता | ५२,२८५ |
| २) | डॉ. शिवलिंग शिवयोगी घाळी | कॉंग्रेस (आय) | ३५,२७७ |
| ३) | श्री. ईश्वर माळी | अपक्ष | १,३०६ |
| ४) | श्री. अक्बर दादामिया काझी | दूरदर्शी पक्ष | ४५५ |

गडहिंग्लज मतदार संघाच्या १९८५ च्या निवडणूकीत जनता पक्षाचे उमेदवार ॲड. श्रीपतराव दिनकरराव शिंदे यांना ५२,२८५ मते मिळाली व कॉंग्रेस (आय) चे उमेदवार डॉ. शिवलींग शिवयोगी घाळी यांना ३५,२७७

मते पडली. डॉ. एस्.एस्. घाळी यांचे प्रतिस्पर्धी श्रीपतराव शिंदे १७,००८ मते जास्त मिळाली. सलग दोन वेळा विजयी झालेले डॉ. घाळी यांना तिस-या खेपेस पराभव स्वीकारावा लागला. काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजीमुळे काँग्रेस (आय) पक्षाचा पराभव झाला.

## ॲड. श्रीपतराव शिंदे यांच्या विजयाची कारणे

डॉ. एस्.एस्. घाळी यांनी सलग दोन वेळा आमदार म्हणून गडहिंग्लज तालुक्याचे प्रतिनिधीत्व केले. सलग तिस-या वेळी उमेदवारी मिळूनही त्यांना पराभव पत्करावा लागला. १९८५ साली तालुक्यात महत्वपूर्ण सत्तांतर होऊन ॲड. श्रीपतराव शिंदे विजयी झाले. श्रीपतराव शिंदे यांच्या विजयाची कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

१) गडहिंग्लज विधान सभा मतदार संघाचा स्वातंत्र्यानंतर इतिहास पडताळता काँग्रेस अंतर्गत लाथाळीने विरोधी पक्षाच्या उमेदवारात अधून मधून आमदार होण्याची संधी मिळत गेली आहे.

२) तालुक्याच्या राजकारणात विरोधी पक्षांचा विचार करावयाचा, तर जनता पक्ष सर्व खेड्यात पोहचलेला आहे. श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या प्रश्नावर सतत चळवळी करून आपली प्रतिमा चांगली राखण्यात आली आहे.

३) डॉ. एस्.एस्. घाळी तिस-या खेपेस उभे होते. त्यामुळे मतदारात नाराजी होती आणि श्रीपतराव शिंदे यांच्याबद्दल सहानुभूती होती. त्यामुळे काँग्रेस (आय) पक्षाला पराभव पत्करावा लागला.

४) १९८५ पासून गडहिंग्लज तालुका पाणीप्रश्न जोरदारपणे चर्चेत आला. निवडणूक प्रचाराचा प्रमुख विषय रामतीर्थ धरण करण्यात येऊन श्रीपतराव शिंदे यांनी निवडणूक जिंकली. पाणी प्रश्नावर जनतेच्या भावना किती तीव्र होत्या हेच श्रीपतराव शिंदे यांच्या विजयाने दाखवून दिले.

५) डॉ. शिवलिंग घाळी यांच्या विरोधी ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी सरळ लढत दिली होती. सर्व विरोधी पक्ष त्यांच्या बाजूने होते. कॉंग्रेस (एस्) चे श्री. बाबासाहेब कुपेकर गट त्यांच्या-बरोबर होता. पुलोद आघाडीचे उमेदवार म्हणून शरद पवारही त्यावेळी त्यांच्या प्रचारासाठी येऊन गेले होते. त्याचाही परिणाम/ प्रभाव जनतेवर होता.

६) तालुक्याच्या विकासाला चालना देणारे विरोधी पक्षाचे स्थानिक नेतृत्व लोकांना मिळाले.

७) गडहिंग्लज तालुक्यामध्ये कायम डॉ. एस्.एस्. घाळी, श्री. नागाप्पा बटकडली व बाबासाहेब कुपेकर यांच्यात गटबाजी होती. या गटबाजी-चाही निवडणूक निकालावर परिणाम झाला.

८) डॉ. एस्.एस्. घाळी यांनी सलग दोनवेळा आमदार म्हणून निवडून जाऊनही १९७८ च्या निवडणूकीनंतर १९८० साली पुन्हा मुदतपूर्व निवडणूका घेण्यात आल्या. अल्पकाळ नेतृत्व करण्याची संधी मिळाल्यामुळे तालुक्याच्या विकासासाठी भरीव कार्य करता आले नाही.[४२]

थोडक्यात या निवडणुकीच्या निमित्ताने तालुक्याचा विकास व्हावा आणि नवीन नेतृत्वाला संधी मिळाली म्हणून अॅड. श्रीपतराव शिंदे यांना जनतेनी निवडून दिले आणि गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात १९८५ साली महत्वपूर्ण बदल झाला. नव्याने आमदार म्हणून प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाल्यामुळे श्रीपतराव शिंदे यांना आपले स्थान बळकट करण्याची व प्रभाव वाढविण्याची संधी मिळाली. ही निवडणूक गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी देणारी ठरली. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात बदल होऊन श्रीपतराव शिंदे यांचे नवे नेतृत्व उदयास आले.

......

## प्रकरण दुसरे

## संदर्भ सूची


१) गोकाक्कर, सुधाकर व श्री. चराटी, शामराव (संपा.) - हिरण्यकेशीच्या काठी, गडहिंग्लज नगरपरिषद शताब्दी स्मृतिग्रंथ प्रकाशन, जानेवारी, १९८९, पृष्ठ नं. १८५, १८६.

२) तत्रैव, पृष्ठ नं. ८.

३) जैन अशोक - महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९३, पृष्ठ नं. २४५, २४६, २४७.

४) गडहिंग्लज पंचायत समिती कार्यालयीन माहिती - १९९५-९६.

५) लोंढे मधुकर (पत्रकार) - यांच्या मुलाखतीवरून, मुलाखत दिनांक ८ नोव्हेंबर, १९९५.

६) चुनखडे ना.ए. आणि पाटील वि.भ. - ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९९०, पृष्ठ नं. १३८, १३९ व १४०.

७) दैनिक सकाळ, कोल्हापूर - ३० नोव्हेंबर, १९९१ (सहकार विशेषांक)

८) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, गडहिंग्लज यांचे कार्यालयीन माहितीवरून. दि. ६ सप्टेंबर, १९९५.

९) दैनिक सकाळ, कोल्हापूर, - दि. ३० नोव्हेंबर, १९९१.

१०) दैनिक मँचेस्टर, इचलकरंजी, - दि. २ फेब्रुवारी, १९९५.

११) दैनिक पुढारी, कोल्हापूर - दि. २८ फेब्रुवारी, १९५७.

१२) गोकाक्कर सुधाकर आणि चराटी शामराव (संपा.), तत्रैव, पृष्ठ नं. २४४.

१३) दैनिक पुढारी, कोल्हापूर - दि. १६ व २० जानेवारी, १९५२.

१४) जैन अशोक - तत्रैव, पृष्ठ नं. ९६.

१५) दैनिक पुढारी, कोल्हापूर - दि. ६,१०,१२ फेब्रुवारी, १९५७, १३ मार्च, १९५७.

१६) तत्रैव, १७ फेब्रुवारी, १९५७, २१ मार्च, १९५७.

१७) जैन अशोक - तत्रैव, पृष्ठ नं. ९७.

१८) दैनिक पुढारी, कोल्हापूर - १२ फेब्रुवारी, १९६२.

१९) तत्रैव, दि. २३ व २७ फेब्रुवारी, १९६२.

२०) तत्रैव, दि. १ मार्च, १९६२.

२१) शेंडे ज.दा. - फलटण तालुक्यातील पक्षीय राजकारण, इ.स. १९७७ ते १९८५, एक टीकात्मक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ एम्.फिल्. (राज्यशास्त्र), पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध, ५ मे, १९८७, पृष्ठ नं. २६.

२२) जैन अशोक - तत्रैव, पृष्ठ नं. ९७.

२३) गोकाक्कर सुधाकर आणि चराटी शामराव (संपा.) - तत्रैव, पृष्ठ नं. २८८, २८९, २९०.

२४) पाटील बी.बी. - भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९९१, पृष्ठ नं. १९७, १९८.

२५) दैनिक पुढारी, कोल्हापूर - १२ फेब्रुवारी, १९७७, २२ मार्च, १९७७.

२६) Chousalkar A.S. - Recent Trends in the Politics of Maharashtra, Page No. 79, 80. Ideal Movements and Politics In India, Book Edited by Dr. K.K. Kavalekar & Dr. A.S. Chousalkar, Published by Mehta Publishing House, Kolhapur & Pune.

२७) कल्याणकर बा.ह. (संपा.) - युगंधर नेते यशवंतराव चव्हाण, समाजप्रबोधनी प्रकाशन, औरंगाबाद, २५ नोव्हेंबर, १९८८, पृष्ठ नं. २३१, २३२.

२८) गायकवाड, र.रा. - सातारा तालुक्यातील पक्षीय राजकारण, इ.स. १९७७ ते १९८७, शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्.(राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी सादर केलेला अप्रकाशित शोधनिबंध, मे, १९९०, पृष्ठ नं. ७०, ७१.

२९) Chousalkar, A.S. - Ibid.

30) गायकवाड र.रा. - तत्रैव, पृष्ठ नं. ७२, ७३.

३१) कामत अ.रा. - स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रातील अर्थकारण आणि राजकारण, भाग - २, तात्पर्य मे, १९८१, (संपा.सुधीर बेडेकर), पृष्ठ नं. २२, २३.

३२) देवमाणूस - स्मरणिका, कै. डॉ. एस्.एस्. घाळी विशेषांक, दैनिक सत्यवादी, दैनिक सकाळ, कोल्हापूर.

३३) गोकाक्कर, सुधाकर व श्री. चराटी काशिनाथ - तत्रैव, पृष्ठ नं.१६२.

३४) दैनिक पुढारी, कोल्हापूर, दि. ४ जून, १९८०.

३५) Chousalkar, A.S. - Ibid.

३६) शेंडे ज.दा. - तत्रैव, पृष्ठ नं. ५२, ५३, ५४.

३७) भिवसनकर के.एस्. - महाराष्ट्र शासन आणि राजकारण, कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट, १९९३, पृष्ठ नं. १२९ ते १३२.

३८) मगदूम राम (संपादक) - आमदार श्रीपतराव शिंदे गौरव, अंक, पृष्ठ नं. ३.

३९) गायकवाड र.रा. - तत्रैव, पृष्ठ नं. १२६ ते १२७.

४०) तत्रैव, पृष्ठ नं. १२९.

४१) दैनिक सत्यवादी, कोल्हापूर - दि. ७ मार्च, १९८५.

४२) दैनिक सकाळ, कोल्हापूर - दि. १६ डिसेंबर, १९८९.

.....